# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १७-०३-२०१७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक १७ मार्च २०१७ रोजी (का.प.क्र.३७) मा.महापौर श्री.भगवान (बापू) देविदास घडमोडे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११-४५ वाजता वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.ओम प्रकाश बकोरिया,आयएएस,नगर सचिव,श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| २. | स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल |
| ३. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ४. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ९. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| १०. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| ११. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १२. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १३. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १४. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १५. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १६. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १७. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १८. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १९. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| २०. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| २१. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| २२. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| २३. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २४. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २५. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २६. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २७. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २८. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |

| | |
|---|---|
| २९. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| ३०. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| ३१. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| ३२. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३३. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३४. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३५. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३६. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३७. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३८. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ३९. | स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी |
| ४०. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरेशी |
| ४१. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ४२. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४३. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ४४. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४५. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ४६. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४७. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४८. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ४९. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ५०. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ५१. | स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ५२. | स.स. श्री.शेख जफर अख्तर |
| ५३. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५४. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५५. | स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश |
| ५६. | स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान |
| ५७. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ५८. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ५९. | स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन |
| ६०. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ६१. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ६२. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ६३. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ६४. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६५. | स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल |
| ६६. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |

| | |
|---|---|
| ६७. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ६८. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ६९. | स.स. श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे |
| ७०. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ७१. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ७२. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ७३. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |
| ७४. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७५. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७६. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ७७. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ७८. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ७९. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ८०. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ८१. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ८२. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८३. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८४. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ८५. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८६. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ८७. | स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन |
| ८८. | स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन |
| ८९. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ९०. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ९१. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ९२. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ९३. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |
| ९४. | स.स. कु.जमादार सायली भागवत |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्री.कांबळे चेतन जनार्धन

श्री.दिलीप थोरात :ज्येष्ठ लेखक, विचारवंत तसेच पंडीत जवाहरलाल नेहरू कॉलेजचे माजी प्राचार्य स्व.गजमल माळी यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.गजानन बारवाल :यास अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे. सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

या वेळी स्व.गजमल माळी यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री.राजू शिंदे :उत्तरप्रदेश, झारखंड, मनिपुर, गोवा या राज्यात विधानसभा निवडणुकीत भाजपा पक्षाला चांगले यश प्राप्त झाले. त्याबद्दल मा.पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करावे.

या वेळी स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात काहीही ऐकू येत नाही.

श्री.नंदकुमार घोडेले :मुंबईचे महापौर यांचे सुध्दा अभिनंदन करावे.

मा.महापौर :मा.पंतप्रधान श्री.मोदी साहेब तसेच मुंबईचे नवनिर्वाचीत मा.महापौर यांचे अभिनंदन करण्यात येते.

श्रीमती सिमा खरात :पाणीपुरवठ्यात ७ दिवसाचा खंड पडला. या कालावधीमध्ये कोणती कामे केली? पाण्याची वेळ काय? केव्हा पाणी सोडले जाते?

श्रीमती मिना गायके :गल्ली नं.५ येथे अर्धा तास पाणी येते. तेही घाण पाणी असते. ड्रेनेज लाईनच्या खाली पाण्याची लाईन आहे. ती बदलून देण्याची मागणी केली. काम होत नाही.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:पाणी कमी वेळ व कमी दाबाने येते. समांतर एजन्सीकडून काम काढल्यानंतर मनपा समांतर लाईनचे काम करणार होते. अद्याप का सुरू केले नाही?

श्रीमती माधुरी देशमुख :माझे वार्डात गुरूसहानीनगर, पारीजातनगर, ए व सी सेक्टर येथील रहिवाशीयांना अजिबात पाणी येत नाही. सहा महिन्यापासून प्रश्न निर्माण झाला. श्री.चहल यांची काम करण्याची इच्छा आहे. परंतु खालचे अधिकारी मदत करीत नाही. पाणी का देत नाही? विचारले असता मीटर बसून घ्या, टँकर देऊ सांगतात. हे स्मार्टसिटी कडे जाण्याचे लक्षण नाही. किमान पाणी, ड्रेनेज, लाईट या सुविधा मिळाल्या पाहिजे. नागरीकांच्या समस्यांना नगरसेवकांना उत्तर द्यावे लागते. ९०० चे टँकर ११०० रू. मध्ये देत आहे. दरवाढ होऊ नये.

श्रीमती सुरेखा सानप :माझे वार्डात सहायनगर वस्ती ७००-८०० घरे १५ वर्षापासुन आहे. तेथे पाणी येत नाही. समांतरने लाईन टाकली. ती जॉईन्ट करणे आहे. तेही काम होत नाही. उत्तरीनगर भागात नारेगाव शाळेत पाणी देत नाही.

श्रीमती शोभा बुरांडे :माझ्या वार्डात पाणी कमी येते. राजगुरूनगर भागात लोकांनी पाण्यासाठी टँकरचे पैसे भरले पाणी मिळत नाही. पाईप लाईनचे काम होत नाही.

श्रीमती अर्चना निळकंठ :वार्डात असलेली टाकी पुर्ण भरत नाही. पाण्याला प्रेशर नसते, पाणी सोडल्यानंतर १०-१५ मिनिटे प्रत्यक्ष पाणी येण्यास लागते.

श्रीमती ज्योती नाडे :७-८ व्या दिवशी पाणी येते. समांतर एजन्सीने लाईन टाकली, जॉईन्ट केले नाही, जुनी पाईपवरून घाण पाणी येते.

श्रीमती आशा निकाळजे :पाणी येण्याचा दिवस असतांना आज वार्डात पाणी आले नाही. वार्डात २० वर्षापासून लोकवस्ती आहे. सर्वे केला. परंतु लाईन टाकली जात नाही.

श्रीमती मुल्ला सलिमा बेगम:वार्डात १ महिन्यापासून पाण्याची टंचाई आहे. चार टँकर देणार होते आले नाही. अधिकारी स्वतः सांगतात पाणी देत नाही.

श्रीमती कमल नरोटे :चार दिवसाआड पाणी येत होते. आता सहाव्या दिवशी पाणी येते, ते सुध्दा घाण पाणी आहे.

श्रीमती सत्यभामा शिंदे :आताच पाणी कमी येते, उन्हाळ्यात पाण्यासाठी काय नियोजन केले? सिडको हडको भागात नेहमीच पाणी कमी दिले जाते. टाकीची लेव्हल येत नाही.

श्रीमती सिमा चक्रनारायण:चौथ्या दिवशी पाणी येते. अनेक नळ लिकेज आहे. पुरेसे पाणी मिळत नाही.

श्रीमती शोभा वळसे :वार्ड २९ मध्ये बी-सेक्टर मध्ये ५-६ घरांना पाणी येत नाही. काही अनधिकृत नळ कनेक्शन्स् आहे ते शोधावे.

श्रीमती ज्योती मोरे :वार्ड ९५ मध्ये आठ वर्षापुर्वी लाईन टाकली. जोडणी होत नाही. ८० टक्के लोकांनी गुंठेवारी भरलेली आहे. तरी त्यांना पाणी मिळत नाही.

श्री.गोकुळसिंग मलके :नारेगाव वार्डात पाच दिवसाआड पाणी येते. वीस दिवसात तीन वेळेस गॅप दिला. चेंबरच्या खाली असलेली लाईन बाजूला घ्यावी. मा.आयुक्तांनी आदेशीत केले काम केले नाही. वोखार्ड पासून क्रॉस कनेक्शन करायचे. ते ही काम केले नाही. घाण पाणी येते. ४० टक्केच लोकांना पाणी मिळते. क्रॉस कनेक्शन जोडले जात नसेल, तर एन-१ येथील गणपती मंदीरापासून लाईन जॉईन्ट केली तरी पाणी मिळेल. तेही काम केले जात नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :सर्व वार्डात पाणी टंचाई आहे. अपेक्षीत प्रमाणे काम करीत नाही. पाणी येणार नाही फोनवर सांगून टाकतात. अनेक भाग गुंठेवारी तेथे लोकांकडे पाणी साठवण्याची सोय नाही. जे दुरूस्तीचे काम होते ते तपासण्याची गरज आहे. ठेकेदारास पैसे दिले नाही म्हणून काम करण्यास तयार नाही त्यामूळे छोटी कामे होत नाही. पाणी किती उचलतो किती पाणी देतो. या सर्व बाबीचे ऑडीट व्हावे. जायकवाडीत मुबलक पाणी असतांना शुन्य नियोजन आहे. ५-६ दिवसाआड पाणी येते. दररोज पाणीपुरवठा करण्यासाठी प्रयत्न केले जावे. प्रॉपर नियोजन करावे.

श्री.अजीम अहेमद :वार्डात ८ दिवसाआड पाणी येते. एका लाईनचे काम अर्धवट आहे. अर्धातास पाणी येते त्यास घाण पाणी आहे.

श्री.आत्माराम पवार :वार्ड ९४ मध्ये पाण्याची मोठी समस्या आहे. ए सी लाईन बदण्याची मागणी केली घाण पाणी येते. दुरूस्ती होत नाही.

श्री.कैलास गायकवाड :गारखेडा परीसरात टँकर द्वारे होत असलेला पाणीपुरवठा आता टँकरच्या ट्रिपा कमी झाल्या. टँकरचे दर वाढले ३० टक्के टँकर बंद केले. नियोजन नाही जी दरवाढ केली ती रद्द करावी. पाणी पुरवठा सुरळीत करावा.

श्री.नंदकुमार घोडेले :सर्वच भागात पाणी पुरवठा विस्कळीत झाला. १५० एमएलडी पाणी येते १२५ इतकेच पाणी शहराला देतो. नियोजनबध्द काम केले. तर एक दिवसाआड पाणी देऊ शकतो. तांत्रिक अडचण, मॅन पावर नाही. अशा अडचणी दाखवतात. हे प्रशासनाचे नेहमीचे ठरलेले आहे. पाण्याचे ऑडीट करावे. जेवढे पाणी उचलतो तेवढे देतो का? बाकी पाणी कुठे मुरते? तपासणी करावी. १.२० लक्ष इलिगल कनेक्शन्स् आहे. त्यांचा बोजा जे कर भरतात. त्यांचेवर पडतो. अर्धा इंच कनेक्शन रेकॉर्डवर परंतु १-२ इंच कनेक्शन असतात. पडेगाव मिटमिटा भागात टाकी बांधली तेथे पाणी देत नाही. ६३ पैकी ४४ टाक्या वापरात आहे. टाक्या धुतल्या जात नाही. ती केंव्हा साफ करतो तेथे बोर्ड लावावे. जेथे पाणी देत नाही तेथे मोफत पाणी दिले जावे. विहिरी किती? हातपंप किती? यातून पाणी घ्यावे नियोजन करावे. समांतर जाऊन सहा महिने झाले पाण्याची अजूनही ओरड आहे. वेगवेगळे प्रकारचे सोर्सेस आहे. त्यातून पाणी घेऊन शहराला सुरळीत पाणीपुरवठा करावा.

श्री.शेख जफर :गल्ली नंबर २०, २१ मध्ये पाणी येत नाही. तीन पत्र दिले काम होत नाही. १५,१६,१७ या गल्लीमध्ये वॉल खराब आहे. सहा दिवसाआड पाणी येते. ते सुध्दा घाण पाणी आहे. मी प्रस्ताव देतो तो घेण्यात का येत नाही?

श्री.बन्सी जाधव :माझ्या वार्डात पाण्याचा प्रश्न सोडवावा.

श्री.नासेर सिद्दीकी :वार्डात पाणी कमी येते. विभागीय आयुक्त कार्यालया जवळील पंपातून पाणी मिळते. चाळीस वर्षापासून तो पंप आहे. खराब आहे. तेथे १०० चा पंप टाकून पाणीपुरवठा करावा.

श्री.अब्दुल नाईकवाडी :अविष्कार कॉलनीत प्रेशरने पाणी येत नाही. तसेच साईनगरमध्ये जुनी २५ वर्षापुर्वीची लाईन आहे. पाण्याचा टाईम निश्चित नाही. लाईन लिकेज होते. घाण पाणी येते. त्यामूळे सुरवातीला १५ मिनिटे पाणी रस्त्यावर सोडावे लागते. अधिकाऱ्यांना कल्पना दिली. तर पत्र द्या पैसे वसुल केले जाईल. असे सांगतात.

श्री.ऋषीकेश खैरे :समर्थनगरच्या आठ भागात सहा महिन्यापासून पाणी प्रश्न आहे. एक ही लाइन टाकली नाही. पाईप उपलब्ध असतांना फक्त लाईन टाकायची होती. तेही काम केले नाही. चार लक्ष बजेट आहे कमी पडते. स्वेच्छानिधीचे पत्र देण्याचे सांगितले पुन्हा सांगतात की, २ लक्ष पर्यतच निधी घेता येईल. याचा अर्थ काम करायचे नाही. सदस्यांना मिस-गाईड करायचे हे बरोबर नाही. १० दिवसापासून पाणी येत नाही. टँकरची मागणी केली तेही देत नाही. नागरीक आमच्याकडे समस्या घेऊन येतात. आम्ही काय उत्तर द्यायचे? माझ्या वार्डातील १०० टक्के लोक टॅक्स भरणारे आहेत.

श्री.रावसाहेब आमले :वार्डात पाईप लाईन नाही. टँकर येत नाही. टँकरसाठी पत्र मागतात. अधिकारी मनमानी करतात. ड्रम प्रमाणे पैसे घेतो. १० दिवसानंतर पाणी दिले जाते. आयुक्तांनी आदेशीत केले. परंतु काम कोणतेच करण्यात आले नाही.टँकरने पाणीपुरवठा करावा.

श्री.भाऊसाहेब जगताप :अंबीकानगर भागात ६ महिण्यापासून घाण पाणी येते. एसी पाईप असल्याने हा प्रॉब्लेम येत आहे. एन-५ टाकीतून जे पाणी येते त्यांची वेळ निश्चित नाही.

श्री.चेतन कांबळे :भिमनगर, भावसिंगपूरा १०० टक्के बेटरमेंन्ट चार्जेस भरलेल्या वसाहती सम्राट अशोक, शिवनिर्माण, आदर्श सोसायटी आहेत. परंतु तेथे सुविधा देत नाही. पाण्याची लाईन टाकावी. तसेच बारापुल्लागेट, मकईगेट, पानचक्की येथील गेटचे दुरूस्तीचे काम करावे.

श्री.राजू शिंदे :कोणत्याच कामा विषयी नियोजन होत नाही. अनेकदा सदस्यांनी सजेशन दिले समांतरचे काम बंद झाले. त्यावेळी पाणीपुरवठा करण्यास प्रशासन सक्षम आहे असे म्हटले होते. सहा महिने झाले. आजही पाण्याच्या अनेक अडचणी येत आहेत. दररोज पाणी का देऊ शकत नाही? या विषयी मा.न्यायालयाने सुध्दा स्वत:हून याचिका दाखल करून घेतली. त्या बाबत मा.न्यायालयात प्रशासनाने काय उत्तर दिले त्याची माहिती द्यावी. आजही चौथ्या दिवशी पाणी येते. एक दिवसाआड पाणी दिले तर लोक मर्यादीत पाणी साठवून ठेवतील व पाणी वाया जाणार नाही.

श्री.विकास एडके :समांतर एजन्सी जाऊन सहा महिने झाले. समांतर लाईन टाकण्याचे काय नियोजन आहे?

श्री.राजेंद्र जंजाळ :सर्व नागरीकांना मुबलक पाणी दिले पाहिजे. समांतर रद्दचा प्रस्ताव आला त्यावेळी मनपा पाणीपुरवठा करणार असे प्रशासनाने म्हटले होते. पाणीपुरवठा विस्कळीत झाला. आज काही नागरीक हंडा मोर्चा घेऊन आले होते. सुविधा देण्यामध्ये आपण मागे पडतो आहोत. समांतर लाईन टाकण्या बाबत शासनाकडून लवकर मान्यता आणून निधी घेऊन काम सुरू करू असे म्हटले होते. मा.न्यायालयात सदरील प्रकरण कुठपर्यत आलेले आहे. दोन दिवसाआड पाणी देऊ असे म्हटले होते. ५-६ दिवसाआड पाणी येते. तेही मुबलक नाही. समांतर योजना रद्द होणार नाही याची दखल घ्यावी. कार्यकारी अभियंता श्री.चहल यांना शहरातील डिस्ट्रीब्युशन लाईन टाकण्याचा अनुभव नाही. जायकवाडीतून किती पाणी येते? मागणी किती आहे? याचे ऑडीट व्हावे. गुंठेवारी भागात टँकरचे पैसे भरतात. पाणी मिळत नाही. पाणीपुरवठा व्यवस्थीत करावा व यासाठी काय नियोजन असणार आहे? याची माहिती घ्यावी.

श्री.गजानन बारवाल :जायकवाडीमध्ये पाणी भरपूर आहे. शहरातील पाणी वाटप व्यवस्थीत होत नाही. अनेक ठिकाणी पुरवठा चांगला होत असतांना प्रेशर नसते, पाणी वेळेवर येत नाही, घाण पाणी येणे असे प्रकार होतात. पदमपुरा भागात सकाळी ३ वाजता पाणी येते. पाण्याच्या टाकीची लेव्हल आली पाहिजे. याची दखल घेत नाही. व्हॉल्व मधून डायरेक्ट पुरवठा होतो. तो वेगळा करावा व पाण्याची वेळ बदलावी.

श्री.नंदकुमार घोडेले :जायकवाडी ते फारोळा पर्यत लाईन टाकण्यासाठी या अर्थसंकल्पात तरतूद करावी. तसेच समांतरचा करारनामा रद्द झाला,आता पाणीपट्टीत वाढ होऊ नये.

श्री.अय्युब जहागीरदार :समांतर लाईनचे काम करण्यात यावे. जी अस्तित्वात असलेली लाईन जुनी झाली, शहरातील विहिरी अधिगृहीत कराव्यात. अंबर नहरीद्वारे पाणी देऊ शकतो. काही भागात टाक्या नाही. तर काही भागात पाण्याची लाइन नाही. पाणचक्कीचे पाणी नाल्यात सोडले जाते. त्यांचा पिण्यासाठी उपयोग करण्याकरीता कार्यवाही करावी.

श्री.गजानन मनगटे :समांतर एजन्सीनंतर मनपाने जातीने लक्ष देऊन काम करायला पाहिजे होते १५ लक्ष लोकसंख्या आहे पैकी अडीच लक्ष लोकांना पाणीच देत नाही. १५० एमएलडी म्हणजे १५ कोटी लिटर पाणी उचलतो. या प्रमाणे प्रत्येक व्यक्तीला दररोज १२५ लिटर पाणी देऊ शकतो. दोन दिवसाआड पाणी देतो. तर उर्वरीत येणारे पाणी कुठे जाते. जायकवाडी ते फारोळा लाईन टाकण्यासाठी ठोस पावले उचलण्याचे आदेशीत करावे. समांतरसाठी आलेला निधी राज्य व केंद्र शासनाचा निधी घेऊन संमातरचे काम करावे. योग्य नियोजन करून शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करावा. आवश्यक कर्मचारी नेमावे. कार्यवाही करावी.

श्रीमती शेख समीना :हर्सुल जटवाडा ते पानचक्की पर्यत मलीक अंबर नहरी लाईन लिकेजेस आहे. ५ एमएलडी पाणी येते १० यायला पाहिजे. लोक कचरा टाकतात. मोटर लावून

पाणी घेतात. ते बंद करावे. सन-२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने आदेशीत केले होते, की या लाईनचे संवर्धन केले जावे. काहीही उपाययोजना केली नाही.

श्री.सचिन खैरे :हनुमान टेकडी जवळील टाकी भरली जात नाही. पुर्ण भागात पुरवठा होत नाही. नवीन लाईन टाकावी. टँकर वेळेवर दिले जात नाही. पैसे भरलेले असतात. नवीन टाकी उभारण्याची कार्यवाही करावी.

कु.सायली जमादार :सातारा गावाला विहिरीचे दुषीत पाणी येते. त्या विहिरीवर जलशुध्दीकरण प्रक्रिया करून पाणी देणार होते. काय कार्यवाही केली?

श्रीमती माधुरी देशमुख :प्रत्येक टाकीच्या ठिकाणी पाणी वाया जाते. त्यासाठी काय कार्यवाही केली?

मा.आयुक्त :प्रत्येक भागात पाण्याचा प्रश्न आहे. ते प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करतो. काही ठिकाणी जास्त मुदतीची कामे असतात. त्यासाठी वेळ लागतो. यापुढे अधिकारी यांची वागणूक सर्वांना चांगली मिळेल. जेव्हा एजन्सी रद्द केली, मा.उच्च न्यायालयात प्रकरण गेले. मनपाच्या बाजुने निकाल दिला. त्यानंतर उच्च न्यायालयात प्रकरण गेले. तत्पुर्वी जीबी ने निर्णय घेतल्यानंतर राज्य शासनाकडे प्रपोजल पाठविले होते. ३२८ कोटी आहे. त्यातून काम करण्यास राज्य शासनाकडे मागणी केली परंतु मा.सर्वोच्च न्यायालयाचे डिसीजन काय आहे? विचारणा करीत आहे. २२ तारखेला कोर्टामध्ये सुनावणी आहे. जो निर्णय मा.कोर्ट देईल ते राज्य शासनास कळवून शासन मान्यता देईल तेव्हा तातडीने टेंडर प्रक्रिया होऊन काम करण्यात येईल. गुरूसहाणीनगर मध्ये टीम पाठविली होती. काम केले जाईल. जेथे परवानगी व्यतिरिक्त नळ कनेक्शन्स् आहेत त्याची तपासणी होईल. ब्रीजवाडी, उत्तरानगरी भागातील पाहणी केली होती. तेथील कामे करणार आहे. मागिल दोन वर्षात १०० कि.मी.डिस्ट्रीब्युशन लाईन टाकल्या. १५० एमएलडी पाणी उचलतो. १२५ एमबीआर पर्यत येते. ८५ ते ९५ एमएलडी वितरीत करतो. बऱ्याच ठिकाणी लिकेजेस आहेत. जुने पाईप आहे वारंवार शट-डाऊन करावे लागते. पुन्हा रोटेशननुसार पाणी दिले जाते. गुंठेवारी, स्लम भागामध्ये पाईप लाईन टाकल्या, वाढ झाली. त्यामूळे पाणी वाटप प्रमाण कमी होते.

श्री.राजू शिंदे :लाईन टाकल्या असतील, परंतु चार दिवसाआड पाणी देतो. तर पाणी कमी पडायला नको.

मा.आयुक्त :मुख्य लॉस हा जायकवाडी ते एमबीआर व त्यानंतर लाईन मध्ये लिकेजेस आहेत.

श्री.रेणुकादास वैद्य :पाण्याचा जो लॉस आहे, तो टँकर विक्री होते त्यात आहे. वॉटर युटीलिटीच्या काळात टँकर मध्ये बोगसगिरी झाली. करोडोचा भ्रष्टाचार झाला. मनपाचा कर्मचारी त्यांची दोन मूले यांनी टँकरद्वारे पाणी विक्री करून घोटाळा केला. त्यांच्या विरोधात पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल झाले. हे लोक आठ आदीवासी वस्तीगृहाला व इतरही खाजगी संस्थेला पैसे घेऊन पाणी देत होते. मनपाचे पाणी होते टँकर वॉटर युटीलिटीकडे होते म्हणून मनपा त्याकडे लक्ष देत नसे, आजही त्या आदीवासी विभागाकडे र.रु.१७ लक्षचे बील बाकी आहे. संबंधीत कर्मचाऱ्यांच्या नावाने पोलीसात एफआयआर दाखल झाला. असे असतांना मनपा प्रशासन काहीच कारवाई का करीत नाही? टँकर कुणाला दिले त्याची यादी

आहे. वार्डात २५-२५ टँकर दिल्याचे भासवून पाणी चोरी होत होते. मेजर लॉस हा होत होता. करोडो रूपये एजन्सीला दिले. त्यावेळी कोण अधिकारी कार्यरत होते? अधिकारी व तो कर्मचारी यांचे संगनमत होते. त्याशिवाय एवढा भ्रष्टाचार होऊ शकत नाही. वॉटर युटीलिटीकडे टँकर गेल्या पासून ते आजपर्यत या पाण्याचे ऑडीट करावे. जो कर्मचारी त्यांनी पाणी विक्री केले, तोच व्यक्ती लाईट विभागात वाहनचालक आहे. दोन्हीकडे काम कसा करीत होता? या विभागावर कुणाचे कन्ट्रोल नव्हते का? यास प्रशासनाचा पाठिंबा आहे असे समजायचे का? माहिती घ्यावी त्यांच्यावर आजच निलंबनाची कार्यवाही करावी व गुन्हे दाखल करावे.

श्रीमती संगिता वाघुले :समांतर कडे दिलेले टँकर कुठे आहे? त्या एजन्सीने मोठा घोटाळा केला गुन्हे दाखल करावे.

श्री.विकास एडके :मनपाचे ११ टँकर होते ते कुठे आहे? ते चांगल्या स्थितीत आहेत का?

मा.आयुक्त :३ सप्टेंबर २०१४ पासून टँकर दिले ते नोंव्हेबर पर्यत यात गोल्ड कन्ट्रक्शन व राम इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीस मनपाने र.रु.१४.७६ कोटी रूपये दिले. पर-डे र.रु.१.७६ लक्ष देत होतो. टँकरच्या बाबत चौकशी चालू आहे. जे दोषी असेल त्यांचेवर १०० टक्के कार्यवाही होईल.

श्री.नंदकुमार घोडेले :चौकशी होत राहिल. संबंधीताचे निलंबन करावे. एफआयआर दाखल झाला तेव्हाच करायला पाहिजे होती. सर्व पुरावे आहे. कार्यवाही करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :दोन तीन वेळेस गुन्हे दाखल झाले. कार्यवाही करायची नसेल व पाठीशी घालणार असेल तर योग्य नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :प्रत्येक नागरीकांना पाणी मिळेल, यासाठी प्रशासनाचे काय नियोजन आहे?

मा.महापौर :आताच म्हटल्या प्रमाणे टँकर पाणी चोरी प्रकरणात संबंधीत कर्मचारी यांचेवर पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. दोषीवर तीन दिवसात कार्यवाही करावी.

श्रीमती समीना शेख :चितेगाव जवळ अज्ञात लोकांनी १४०० MM ची लाईन फोडली. पाणी वाहते त्या बाबतीत काय कार्यवाही केली?

मा.महापौर :अर्ध्या तासासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ १.३० वा.सभेला २.५५ वा.सुरूवात)

मा.महापौर :श्री.चहल यांनी सर्व प्रश्नांचे उत्तर द्यावे.

कार्य.अभियंता-श्री.चहल :६ मार्च रोजी जायकवाडी ते शहरापर्यत मुख्य लाईनवर ३५ लिकेजेस होते ते बंद करणेचे काम केले. ४-५ एमएलडी पाणी कमी येत होते. त्यानंतर रेल्वेस्टेशन जवळ एक मोठे लिकेजेस होते ते काम काल झाले. थोड्या फार प्रमाणात पाणीपुरवठा विस्कळीत झाला. २-४ दिवसात सर्व शहरात पाणीपुरवठा व्यवस्थीत होईल. आता पाण्याला प्रेशर राहिल.

श्रीमती शोभा बुरांडे :वार्डात पाणी येत नाही, टाकीची लेव्हल येत नाही. त्यामूळे पाणी कमी येते. असे सांगतात.

कार्य.अभियंता-श्री.चहल :काही लोक जास्त पावरच्या मोटार लावून पाणी घेतात, त्यामूळे पाणीपुरवठयावर परिणाम होतो.

श्री आत्माराम पवार :एसी लाईन बदलण्याचे सुचविले. काम करीत नाही. टाकीची लेव्हल आली तर पाणी मिळू शकते. माझ्या वार्डात असंख्य महिला व पुरूष कामगार आहे त्यांना सकाळीच कामावर जावे लागते.

कार्य.अभियंता :नवीन लाईन टाकण्याची मागणी होते. नंतर पाण्याची मागणी होते. पाणी देण्यामध्ये टप्पे वाढले जाते, त्याचा परिणाम पाणीपुरवठयावर होतो. टाकीची लेव्हल येण्यासाठी प्रयत्न केले जाईल.

श्रीमती माधुरी देशमुख :एन-५ च्या टाकीवर किती पाणी साठवण होते? काही ठिकाणी १ ते २ तास पाणी तर काही ठिकाणी २० मिनिट पाणी येते याचेही नियोजन करावे.

कार्य.अभियंता :एन-५ टाकीवर ३५ एमएलडी पाणी येते. शट-डाऊनमूळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे.

श्रीमती मिना गायके :गल्ली नं.५ मध्ये पाणी येत नाही. त्या भागात पाण्याची लाइन टाकण्यात यावी.

श्री.गोकुळसिंग मलके :वार्डात पाच दिवसानंतर पाणी येते कारण काय? वार्डातील चेंबरच्या खाली असलेली पाईप लाईन बदलली नाही. तेथून चार गल्ल्यांना घाण पाणी येते.

कार्य.अभियंता :नारेगाव येथे ३ दिवसाआड पाणी देतो. ती लाईन सीआयची आहे. बदलून अर्थ नाही. सीमेंटची असती तर शिफ्ट केली असती. येत असलेले घाण पाणी बंद केले आहे. शहरात येणाऱ्या पाण्यात वाढ झाल्याशिवाय नवीन लाईन टाकू शकत नाही.

मा.आयुक्त :दुषित पाणी येत असेल तर ते बंद करण्यात येईल. देखभाल दुरूस्तीसाठीचा निधी आहे. त्यातून काही काम करता येईल. ज्या ठिकाणी आवश्यक आहे तेथे नवीन लाईन होईल. जोपर्यंत जायकवाडीतून जास्तीचे पाणी येत नाही तोपर्यंत डिस्ट्रीब्युशन लाईन करणे योग्य वाटत नाही. नारेगाव भागात आवश्यक पाणीपुरवठयाची व्यवस्था करण्यात येईल.

श्री.अब्दुल नाईकवाडी :साईनगर, अविष्कार कॉलनी भागात पाणी येत नाही. लाइन बदलून द्यावी. घाण पाणी येते. ६७-३ सी मध्ये काम तातडीने करावे.

श्री.गजानन मनगटे :६७-३ सी मध्ये पाणी पुरवठ्याची कामे तातडीने करावी.

मा.महापौर :पाणी पुरवठ्या विषयी प्रशासनाने नियोजन करावे. शहरातील विहिरी, हातपंप नहरी अंबर असेल त्यातील पाणी वापरात आणला. येईल अशी कार्यवाही करावी. घाण पाणी बंद करावे. काही ठिकाणी पाणी येत नाही तेथे पाणी देण्यात यावे. ज्या वार्डात पाण्याची समस्या असतील, त्या विषयी स.सदस्य यांनी सभागृह नेते, गट नेते यांच्याकडे तक्रारी द्याव्यात. ३-४ दिवसात महापौर दालनात बैठक आयोजित केली जाईल. त्यात गटनेते, स.पदाधिकारी उपस्थित असतील. ज्या सुचना केल्या त्याचा अभ्यास प्रशासनान काय नियोजन करणार? याची माहिती ठेवावी.

श्री.नंदकुमार घोडेले :पाणीपट्टीत कुठलीही दरवाढ करू नये. रू.३७००/- आता आहे तीच ठेवावी.

मा.महापौर :मा.न्यायालयाचा जो निर्णय असेल, त्याची अंमलबजावणी करावी. परंतु पाणीपट्टीत वाढ होऊ नये.

श्रीमती समीना शेख :६२ वाहनचालक नियुक्त केले. त्याची मान्यता घेतली होती का? विना टेंडर कार्यवाही केली.

मा.महापौर :लेखी उत्तर स.सदस्यांना देण्यात यावे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:निधी येण्यापूर्वी भाजपाने केला गेम अशी बातमी आली. एकूण शहरातील ४८ रोड करणार आहे. त्यातील ६ फक्त पश्चिम मतदार संघात करणार असे दिले. जे रस्ते फायनल झाले त्याची यादी द्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :जो निधी येणार आहे, तो सर्व समावेशक असावा. सर्व भागात कामे व्हावी.

मा.महापौर :जो निधी येईल तो सर्व समावेशक, सर्व भागातील कामासाठी असेल कुणावरही अन्याय होणार नाही.

**विषय क्रमांक ९२८:-**

शनिवार दिनांक १८.०२.२०१७ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३५) रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.महापौर :इतिवृत्त दुरूस्तीसह मंजूर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शनिवार दिनांक १८.०२.२०१७ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३५) रोजीच्या सर्वसाधारण सभेतील विषय क्रमांक-९०६ च्या ठरावामध्ये वार्ड क्र.०७ मयुरपार्क अंतर्गत असलेल्या विकास कामाचे लेखाशिर्ष बदलण्याच्या दुरूस्तीसह दिनांक १८.०२.२०१७ चे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१६-२०१७ मधील लेखाशिर्ष | नवीन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | गंगाधर चव्हाण (अरुणोदय) सो स.नं.१८८/१ अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण करणे, जलनि:सारण वाहिनी टाकणे. LAYOUT NEW WORK P.NO.5 बुक:- १ रक्कम रुपये १० लक्ष | वॉर्ड क्र.७, मयुरपार्क अंतर्गत खुली जागा विकसीत करणे<br>रक्कम रुपये १० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९२९:-**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

**मा. सर्व साधारण सभे समोर सादर करावयाचा स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी ) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणेसाठी अहवाल सादर**

अहवाल सादर करण्यात येतो की, देशातील सर्व शहरे हागणदारी मुक्त करुन शहरातील घनकच-याचे व्यवस्थापन करण्यासाठी केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान (नागरी) दिनांक ०२ ऑक्टोबर २०१४ पासुन राबविण्यास सुरुवात केली आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी ) ची अंमलबजावणी सुरु केली आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रामध्ये अंतर्गत जे नागरिक उघडयावर शौचास जाण्याची पध्दत वापरतात व ज्या नागरिकांकडे वैयक्तिक शौचालय नाही फक्त अशाच नागरिकांना सदर योजनेतुन वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामासाठी शासना मार्फत रक्कम रुपये १२०००/- प्रति शौचालय एवढे अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे .सदर अनुदानामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा रक्कम रु. ४०००/- व राज्य शासनाचा हिस्सा रक्कम रु.८०००/- इतका आहे. या संदर्भाने सदरील अभियानाअंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे कार्यवाही करण्यात येत असून आतापर्यत झालेल्या कामाचा प्रगती अहवाल खालीलप्रमाणे आहे.

इति.स.सा.सभा दि.१७.०३.२०१७
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३७)

औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत वैयक्तीक शौचालय बांधकामासाठी अनुदानास पात्र लाभार्थ्याची निवड करण्याची कार्यवाही सुरु असून आज पर्यत ६०१२ लाभार्थ्याची निवड करण्यात आलेली आहे. त्यापैकी सुमारे ५६९३ लाभार्थ्यास अनुदाना पहिला हप्ता रक्कम रु.६०००/- प्रति लाभार्थी इतका त्यांच्या बॅकेच्या खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करण्यात आलेला आहे. उर्वरीत ३१९ पात्र लाभार्थी यांना पहिल्या हफ्त्याची रक्क्म RTGS करणेची कार्यवाही सुरु आहे. आतापर्यत लाभार्थ्यास पहिल्या हप्त्याच्या अनुदाना पोटी एकुण रक्कम रु. ३,४१,५८,०००/- इतकी वितरीत करण्यात आलेली आहे

तसेच आजपर्यत एकुण ३१८१ लाभार्थ्यानी शौचालय बांधकाम पूर्ण केलेले असून १०१६ लाभार्थ्याचे शौचालयाचे बांधकाम सुरु आहे तसेच १४९६ लाभार्थ्यामार्फत शौचालयाचे बांधकाम सुरु करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. बांधकाम पूर्ण केलेल्या २६४७ लाभार्थ्यास अनुदानाचा दुसरा हप्ता रक्कम रु.६०००/- प्रति लाभार्थी इतका त्यांच्या बॅकेच्या खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करण्यात आलेला आहे. उर्वरीत ५३४ लाभार्थ्याना दुस-या हप्त्याची रक्कम RTGS करणेची कार्यवाही सुरु आहे. आतापर्यत एकुण २६४७ लाभार्थ्यास दुस-या हप्त्याच्या अनुदाना पोटी एकुण रक्कम रु. १,५८,८२,००० /- इतकी वितरीत करण्यात आलेली आहे. पहिल्या व दुस-या हप्त्याच्या अनुदाना पोटी एकूण रक्कम रु.५,००,४०,०००/- इतकी वितरीत करण्यात आलेली आहे .

आजपर्यत एकूण ५२५६ लाभार्थ्याचे फॉर्म तसेच शौचालय बांधकाम पूर्ण झालेल्या ३१८१ लाभार्थ्या पैकी ३०२० लाभार्थ्याच्या शौचालय बांधकामाचे फोटो शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात आलेले आहेत. उर्वरित लाभार्थ्याच्या शौचालय बांधकामाचे फोटो व फॉर्म अपलोड करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच शहरातील ज्या भागात open defecation चे प्रमाण जास्त आढळून आले आहे. अशा भागात सर्व्हेक्षण करुन चार स्थळे अनुक्रमे १) आंबेडकरनगर २) मिसारवाडी ३) हर्षनगर फाजलपुरा व ४) शताब्दीनगर या भागात सार्वजनिक वापरासाठी शौचालय बांधणे व केवळ महिलाकरीता एकुण सहा ठिकाणी शौचालय बांधकाम करण्यासाठी महानगरपालिकेने रक्कम रु. १३५.०० लक्षच्या निविदा काढण्यात आलेल्या आहेत. तसेच आणखी चार ठिकाणी Pay & Use तत्वावर सुलभ शौचालय बांधण्यात येणार आहेत. अशी एकुण १४ पब्लीक टॉयलेटची कामे हाती घेण्यात येणार आहेत. या अंतर्गत एकूण १०० बैठकीचे (seats) नियोजन केलेले आहे. कार्यादेश झाल्यानंतर कामे हाती घेण्यात येतील. करिता अहवाल मा. सर्वसाधारण सभे समोर माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.

## औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद
## स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) तपशिल दिनांक १४/०३/२०१७

| जनगणना सन २०११-नुसार शौचालय बांधकाम करावयाचे उद्दिष्ट | | वार्ड कार्यालय | | | | | | | ११९९७ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ .क्र | तपशिल | झोन-१ अ | झोन-२ क | झोन-३ एन-६ | झोन-४ एन-११ | झोन-५ ब | झोन-६ ई | झोन-७ फ | झोन-८ सातारा | झोन-९ ड | एकुण |
| १ | वार्ड अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या | २६३७ | २९० | २६ | ४१२ | ३८२७ | ६६०५ | ७१३ | ५३०४ | ६१४ | २०४२८ |
| २ | तपासणी झालेली अर्जाची संख्या | २६३७ | २९० | २६ | ४१२ | ३८२७ | ६६०५ | ७१३ | ५३०४ | ६१४ | २०४२८ |
| ३ | पात्र लाभार्थ्याच्या अर्जाची संख्या | ६१८ | ४१ | २६ | २९५ | ११५१ | २७९२ | ११७ | ६२७ | ३४५ | ६०१२ |

इति.स.सा.सभा दि.१७.०३.२०१७
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३७)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | एकुण अपात्र लाभार्थी संख्या | २०१९ | २४९ | ०० | ११७ | २६७६ | ३८१३ | ५९६ | ४६७७ | २६९ | १४४१६ |
| ५ | अपात्र लाभार्थ्याची नावानिशी प्राप्त यादी | ७३२ | २४९ | ०० | ११७ | २६७६ | २६८३ | ५९६ | ४४४७ | २६९ | ११७६९ |
| | *पहिला हप्ता* | | | | | | | | | | |
| ६ | RTGS साठी पाठविण्यात आलेल्या लाभार्थ्याची संख्या | ६१८ | ४१ | २६ | २९५ | ११५१ | २७९२ | ११७ | ६२७ | ३४५ | ६०१२ |
| ७ | RTGS झालेल्या लाभार्थ्याची संख्या | ५७८ | ४० | २४ | २७४ | ११०६ | २६५७ | ११५ | ६०३ | २९६ | ५६९३ |
| ८ | RTGS न झालेल्या लाभार्थ्याची संख्या | २६ | १ | ०२ | २१ | ०९ | ७० | ०२ | २४ | २५ | १८० |
| ९ | RTGS च्या कार्यवाही अंतर्गत असलेली संख्या | ५+४ | ०० | ०० | ०० | ३६ | ४२+२४ | ०० | ०० | २३ | १३४ |
| | *दुसरा हप्ता* | | | | | | | | | | |
| १० | RTGS करिता शिफारस केलेल्या लाभार्थ्यांची संख्या | ३५७ | ११ | -- | २६ | ६७९ | १३८६ | ४३ | ३६८ | ९० | २९६० |
| ११ | RTGS झालेल्या लाभार्थ्याची संख्या | ३४७ | ११ | -- | २१ | ५७४ | १२६० | ४३ | ३०७ | ८४ | २६४७ |
| १२ | RTGS न झालेल्या लाभार्थ्याची संख्या | १० | ०० | -- | ०५ | ०६ | ११ | ०० | १० | ०६ | ४८ |
| १३ | RTGS च्या कार्यवाही अंतर्गत असलेली संख्या | ०० | ०० | -- | ०० | ७०+२८ | ११५ | ०० | ५१ | ०० | २६४ |
| | *अनुदान वितरण* | | | | | | | | | | |
| | एकुण प्राप्त अनुदान | | | | | | ५.६६२१ कोटी | | | | |
| | पहिला हप्ता | ५६९३ x ६०००/- | | | | | ३.४१५८कोटी | | | | |
| | दुसरा हप्ता | २६४७ x ६०००/- | | | | | १.५८८२ कोटी | | | | |
| | एकुण | | | | | | ५.००४०कोटी | | | | |
| १४ | शौचालय बांधकाम पुर्ण झालेल्या लाभार्थ्याची संख्या | - | - | - | - | - | - | - | -- | - | ३१८१ |
| १५ | शौचालय बांधकाम सुरु असलेली संख्या | - | - | - | - | - | - | - | -- | - | १०१६ |
| १६ | शौचालय बांधकाम सुरु न झालेले | | | | | | | | | | १४९६ |
| १७ | अपलोड झालेले फॉर्म | - | - | - | - | - | - | - | -- | - | ५२५६ |
| १८ | अपलोड झालेले पब्लीक टॉयलेट | | | | | | | | | | २३ |
| १९ | वैयक्तीक शौचालय फोटो अपलोड | - | - | - | - | - | - | - | -- | - | ३०२० |
| २० | फोटो अपलोड न झालेले | | | | | | | | | | १६१ |

मा.महापौर :मा.आयुक्तांनी माहिती द्यावी.

मा.आयुक्त :वैयक्तिक शौचालय करण्याचे टारगेट ७ हजारचे होते. आतापर्यत ३१२१ शौचालय केले. उर्वरीत शौचालय ३१ मार्च पर्यत पुर्ण करण्याचा मानस आहे. शासनाचे असे धोरण आहे की जे उघड्यावर शौचास जातात ते स्पॉट मुक्त करावे. असे ५० स्पॉट आहे. त्या पैकी १६ स्पॉट मुक्त केले. ३४ स्पॉट राहिले तेथे १६०० टॉयलेट करावे लागेल. यासाठी काही इन्डस्ट्रीयल मालकांशी चर्चा केली. काही बँका सहकार्य करण्यास तयार आहेत. सन-२०१९ पर्यत पुर्ण भारत देश स्वच्छता मुक्त करायचा आहे. १४ सार्वजनिक टॉयलेट मनपाच्या फंडातून करणार आहे. जे यापुर्वी टॉयलेट केलेले आहे ते दुरूस्त करण्यासाठी काही सामाजिक संस्था व इन्डस्ट्रीयल मालकांशी चर्चा करून ते मदत करतील. त्या माध्यमातून काही कामे करता येईल.

श्री.राजू शिंदे :सर्व्हे केला काहींनी लोकांनी अर्धवट शौचालय केले तेथे शौचालय असल्याचे दाखवून त्या नागरीकांचा यात सहभाग झाला नाही. अशा शौचालयाचाही सर्व्हे करून या योजनेत समावेश करावा. ३ हजार वाढीव रक्कम देणार आहे. त्यापेक्षा आणखी जास्त रक्कम देऊन जुने शौचालय दुरूस्त होत असेल तर जो खर्च दुरूस्तीसाठी येईल तो खर्च देण्यात यावा. अटी व शर्ती आहेत त्या शिथील कराव्यात. स.सदस्यांना विश्वासात घेऊन एसआय च्या माध्यमातून सर्व्हे करावा व त्यांचा रिपोर्ट घ्यावा. स.सदस्य, अधिकारी यांची कमेटी करावी. त्या कमेटीच्या अहवालानुसार मागेल त्याला शौचालय देण्यात यावे.

श्री.नंदकुमार घोडेले :एनजीओच्या माध्यमातून सार्वजनिक, वैयक्तिक शौचालयासाठी मदत घ्यावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :राजनगर, मुकूंदनगर भागात १५०० शौचालय झाले. १२०० लोकांनी अर्ज केले मुख्य लाईनचे काम होत नाही म्हणून काम करता येत नाही. तेथे लाईनचे काम करण्याचे आदेशीत करावे जे की, शौचालय बांधण्याचे जे टारगेट आहे ते पुर्ण होईल.

मा.आयुक्त :काही ठिकाणी टॉयलेट केले तरी युज करीत नाहीत. काही ठिकाणी ड्रेनेज लाईन नाहीत, पाणी नाही, छोट्या अडचणी आहेत. महाराष्ट्रातील इतर लहान मनपामध्ये हागनदारी मुक्त शहर सेप्टी टँकच्या माध्यमातून केलेले आहे. या शहरातही ती परीस्थिती व्हावी. यासाठी आता कुणीही साधा अर्ज दिला तरी त्यांना याचा लाभ मिळेल. ११०० लोक असे आहेत की त्यांनी पहिला हप्ता घेतला परंतु कामच सुरू केले नाही.

श्री.राजू शिंदे :यासाठी स.सदस्य यांना विश्वासात घेऊन कॅम्प लावून वार्ड वाईज कार्यवाही करावी लागेल. कुणाला हप्ता दिला किंवा दिला नाही समोर आले तरच दुसऱ्याला त्यांचा लाभ देता येईल. यासाठी वार्डवाईज कॅम्प लावावा. अधिकारी नियुक्त करावे.

मा.आयुक्त :मुकूंदवाडी, रेल्वेस्टेशन भागात ड्रेनेज लाईनच्या कामासाठी नगरोत्थानचा निधी वैयक्तिक आहे. त्यातून काम केल्यास जवळपास ३००० लोकांना वैयक्तिक शौचालय मिळतील. ५० स्पॉट असे आहे की, उघड्यावर शौचालयास जातात यासाठी सदस्यांनी सहकार्य करावे.

श्री.नंदकुमार घोडेले :जे रिजेक्टच्या लिंक मध्ये आहे. परत व्हेरीफिकेशन करावे. त्यांनाही यात समावेश करून घ्यावा.

मा.महापौर :जे लाभार्थी आहेत, ते सोडून ज्यांना गरज आहे. तेथे अधिकारी यांनी व्हिजीट करून त्यांना काय मदत करता येईल ती करावी. मनपा फंड असेल सीएसआर माध्यमातून असेल ते काम प्रशासनाच्या माध्यमातून जे योग्य वाटेल ते नियमाने करावे. हे शहर स्वच्छ होऊन ओडीएफ मुक्त होईल तशी कार्यवाही करावी.

श्रीमती माधुरी देशमुख :सार्वजनिक शौचालयाचे भुमीपूजन केले. त्यात बेबीचा मकबरा येथे ऑलरेडी ओपनस्पेस मध्ये शौचालय आहे ते कोणाचे आहे? त्याच बाजूला एका शौचालयाचे उद्‌घाटन केले.

कार्य.अभि.ज.नि.वि.प्र :जेथे उद्‌घाटन केले ते लेडीज टॉयलेट आहे. जे तेथे आहे जे पार्कींग करतात त्यांचेसाठी ते आहे. हे टॉयलेट करण्यासाठी आपण विनंती पत्र सुध्दा दिले आहे. त्यांनी आक्षेप पण घेतला की, हे कशासाठी करता, काल एक पत्र

एएसआय कडून आले की, ही जागा आमची आहे. त्या संबंधी पत्र तयार केले, उत्तर देणार आहे.

श्रीमती संगीता वाघुले :आताच आयुक्तांनी म्हटले की, साधा अर्ज दिला तरी टॉयलेट मिळेल. परंतु तसे होत नाही. कागदपत्राची मागणी केली जाते.

श्रीमती स्वाती नागरे :एन-११, भाजी मंडई येथे सुलभ शौचालय करावे.

श्रीमती ज्योती पिंजरकर:आंबेडकर चौकाच्या बाजूला सार्वजनिक शौचालय करावे.

मा.महापौर :स.सदस्याची सुचना प्रशासनाने विचारात घ्यावी. विषय मंजूर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीच्या अहवालास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३०:-** **(नगर रचना विभाग)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ अस्तित्वात आल्यानंतर औरंगाबाद महानगरपालिकेने याची अंमलबजावणी करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेत ठराव पारीत केला (सभा दि.१८.०२.२००२, ठराव क्र.५६६/०५) त्यामध्ये शासनाने ठरवून दिलेल्या दराचा ५०% दराने विकास आकार आकारण्याचे धोरण स्विकारण्यात आले.

हे धोरण महानगरपालिकेने गुंठेवारी वसाहतीमध्ये राहणाऱ्या नागरीकांची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन स्वीकारले आहे. परंतु प्रचलित पध्दतीनुसार ५५.७६ चौ.मी.पेक्षा मोठ्या आकाराच्या भुखंडांना देखील याच दराने विकास आकाराची आकारणी केली जात आहे.

पायाभुत सोयी पुरविण्यासाठी लागणारा विकास आकाराचा दर व प्रत्यक्ष आकारण्यात येणारा दर यात मोठी तफावत आहे. मंजुर रेखांकनासाठी आकारण्यात येणारा दर रु.७७०/- प्रती चौरस मीटर व जमीन विकास शुल्क वार्षिक मुल्यदर तक्ता यामधील नमुद दराच्या ०.५% आहे. यामुळे तुलनात्मकदृष्ट्या गुंठेवारीमधील दर फार कमी आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. करीता, दरवाढीबाबत पुढीलप्रमाणे धोरण ठरविणे योग्य राहील.

१५०.०० चौ.मी.क्षेत्रापर्यंतचे भूखंडासाठी सध्याच्या गुंठेवारीचा प्रचलित दर ठेवण्यात यावा व १५०.०० चौ.मी.पेक्षा जास्तीच्या भुखंडात/घरात रेखांकनासाठी आकारण्यात येणाऱ्या प्रचलित दराने म्हणजेच ७७०/- रुपये प्रती चौ.मी. व जमीन विकास शुल्काची आकारणी करावी. जेणे करून मंजुर रेखांकन व अनाधिकृत वसाहतीमधील भुखंड यांना आकारण्यात येणाऱ्या दरांमधील असमानता दुर करता येईल.

करीता, गुंठेवारी वसाहतीमधील १५०.०० चौ.मी.पेक्षा जास्त क्षेत्राचे (ज्यांच्याकडे मालकी हक्काची अधिकृत कागदपत्रे आहे त्यांना) भुखंडाना नियमीत दराने विकास खर्च व एल.डी.सी.आकारणे योग्य राहील. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

श्री.अब्दुल नाईकवाडी :ज्यांचे ६०० चे प्लॉट आहे घर आहे, ते पाडणार का? १५०० स्क्वे.फुट असलेले ओपन जागा आहे का?

श्री.नंदकुमार घोडेले :रेग्युलर ले-आऊट होल्डरांना विकास खर्च व एलडीसीचे काय रेट लावतो? गुंठेवारीच्या लोकांना जे दर लावले यात किती फरक आहे? त्यांना काही सवलत आहे का? आपली जी संकल्पना होती की ऑलरेडी बांधलेल्या इमारती अधिकृत करून देणे. यात सर्रास प्लॉट होल्डरांना गुंठेवारीचा फायदा दिला तर अनेक लोक त्यांची जागा असेल तर प्लॉट पाडून गुंठेवारी करतील.

श्री.रेणुकादास वैद्य :गुंठेवारी भागात असे प्लॉट असतील असे वाटत नाही. गुंठेवारीत ज्या आरक्षीत जागा होत्या तेथे २०X३० प्लॉट करून विक्री केले. तेथे इंचभर जागा नाही. असे प्रस्ताव येण्याचे कारण काय? स्पष्ट सांगावे.

श्री.गजानन मनगटे :अशी शंका येते की, ज्यांचे ग्रीन जमीनी आहेत. त्या लिगल करून मोठ्या इमारती बांधतील. भुमाफियाचा फायदा होऊ शकतो. जो भाग डेव्हलप होत नाही अशा जमिनी गुंठेवारी भरून डेव्हलप करून घेतील.

सहा.संचालक(न.र) :९५ टक्के भुखंड २०X३० च्या खाली आहे. छोटे भुंखड घेणारे लोक गरीब असतात, त्यांना विशेष सवलत देतो. रेग्युलर ले-आऊट मधील प्लॉटसाठी ७७० बेटरमेन्ट घेतो. ज्यांचे मोठे प्लॉट आहे तेही लोक कमी प्लॉट असलेल्या प्रमाणे फायदा घेतात. त्यामुळे हा प्रस्ताव ठेवला. जे की. मोठ्या भुखंडाधारकांना रेग्युलर बेटरमेन्ट चार्जेस आकारुन कार्यवाही करता येईल. गुंठेवारीच्या नियमात इतर कोणतीही सवलत देत नाही. गुंठेवारीची आधी जशी कार्यवाही होते तशीच आताही चालू राहील. फार काही उत्पन्न यातून मिळणार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :सन-२००१ चा गुंठवारी कायदा आहे. १६ वर्षात गुंठेवारी भागात मोठे प्लॉट असतील असे वाटत नाही. बेसीकली हा प्रस्ताव ठेवतांना विचार केलेला नाही. सन-२००१ च्या अगोदरचा प्लॉट असेल तर रेग्युलाईज करण्याचे कारण नाही ताब्यात घेतला पाहिजे. हा चुकीचा प्रस्ताव आहे फेटाळण्यात यावा.

श्री.नंदकुमार घोडेले :गुंठेवारीचा प्लॉट व या प्लॉटमध्ये नियमामध्ये काय फरक असणार आहे?

सहा.संचालक-न.र :गुंठेवारीतील बांधकाम हे गुंठेवारी कायद्याअंतर्गत रेग्युलर होते. रेग्युलर ले-आऊट हे डीसी रूल नुसार होते. गुंठेवारी तील प्लॉट असेल तर त्यास तेच नियम लागू राहतील.

श्री.राजेंद्र जंजाळ :गुंठेवारीमधील प्लॉट नियमित करतो, बांधकाम नियमित करीत नाही. त्यामूळे सामासिक अंतराचा प्रश्न येत नाही. १५०० प्लॉट असलेले किती लोक गुंठेवारी नियमित करणेसाठी आले.१५०० चे प्लॉट लिगल होणार, परवानगी मिळणार इल्लिगल असण्याचा प्रश्न येत नाही.

सहा.संचालक-न.र :५ टक्के लोक असतील.

श्री.आत्माराम पवार :गुंठेवारी भामध्ये १२०० वर प्लॉट नसेल २०X३० चे प्लॉट आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :आज मंजूर केले तर भविष्यात स्लममध्ये बिल्डर जाणार. १०-१५ प्लॉट एकत्र करणार इमारत बांधून विक्री करणार जे परवानगीतून उत्पन्न मिळेल ते ही येणार नाही.

श्री.भाऊसाहेब जगताप :गुंठेवारीमध्ये ६०० च्या वर प्लॉट नाही. प्लॉट असला तरी तो दोन-तीन प्लॉट मिळून असेल. हा प्रस्ताव मान्य करू नये.

श्री.सिताराम सुरे :१४३ वसाहती किंती गुंठेवारी केली. गुंठेवारी ९५ टक्के प्लॉट आहे. आताच म्हटले, रेग्युलाईज करणेसाठी चलन देत नाही. गुंठेवारीतील काही आरक्षण रद्द केले काही ठिकाणी प्लॉट लिगल केले. काही ठिकाणी आरक्षण आहे. म्हणून लिगल केले नाही, हा दुजाभाव कशासाठी? हा ठराव येण्यामागे अधिकारी व काही लोक मिळालेले असतील हा प्रस्ताव मंजूर करू नये.

श्री.रेणुकादास वैद्य :गुंठेवारी करणेसाठी कॅम्प लावत नाही. ते लोक पैसे भरण्यास तयार आहे. करोडोचे उत्पन्न येणार आहे. ते सोडून चुकीचे प्रस्ताव देणे योग्य नाही. रद्द करावा.

श्रीमती संगीता वाघुले :आरतीनगर, मिसरवाडी भागात गुंठेवारी करण्यास लोक तयार आहे. नियम व अटी शिथील कराव्यात. गुंठेवारी नियमित करून घ्यावी. हा प्रस्ताव मंजूर करू नये.

श्री.राजू शिंदे :काही गोष्टी मुद्दामहून लिगल करण्यासाठी हा प्रस्ताव आला असावा. अशी शंका येते. उत्पन्न येण्यासाठी इतर बाबतीत वाव आहे. सन-२००१ चा गुंठेवारी कायदा आहे. सन-२०१७ चालू आहे. एखाद्याचा प्लॉट असेल तो लिगल करणेसाठी हे करतो का? असे प्रस्ताव आणतांना स.पदाधिकारी यांचेशी चर्चा केली पाहिजे. गुंठेवारी रेग्युलाईज करणेसाठी कमेटी सक्षम करावी. तो विभाग सक्षम करावा. हा प्रस्ताव रद्द करावा.

मा.महापौर :गुंठेवारी रेग्युलाईज होत नाही. तक्रारी आहे. गुंठेवारी कक्ष सक्षम करावा ज्यांची गुंठेवारीची प्रकरणे असतील ते त्या मिळकत धारकांना कोणताही त्रास न होता रेग्युलाईज करावे हा प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यास मंजुरी देण्यात आली.

**<u>विषय क्रमांक ९३१:-</u>** **<u>(मालमत्ता विभाग)</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र./-३५३/नवि-२०, मंत्रालय, मुंबई-४००-०३२, दि.२४.०८.२०१६ नुसार महाराष्ट्र शासनाच्या वतीने संत शिरोमणी श्री.सावता माळी शेतकरी आठवडी बाजार अभियान राबविण्याचे दि.१२.०८.२०१६ च्या शासन निर्णयाप्रमाणे मान्य केले आहे. सदर आठवडी बाजाराच्या अभियानासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांची समन्वयक संस्था म्हणून नियुक्ती झालेली आहे. या आठवडी बाजारामध्ये शेतकरी फक्त ताजी फळे व भाजीपाला शेत मालाची विक्री करणार आहे. या आठवडी बाजाराचे आयोजन नोंदणीकृत शेतकरी उत्पादक संस्था किंवा ग्राहक सहकारी संस्था किंवा कृषी पणन सहकारी संस्था (खरेदी विक्री संघ) हे असणार आहे. ज्या जागेवर महानगरपालिका परवानगी देणार आहे. त्या जागेवर महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांच्या नियोजनाखाली आठवड्याच्या ठरवून दिलेल्या दिवशी आणि वेळेवर शेतकरी आठवडी बाजार भरवेल. या आठवडी बाजारामध्ये फक्त शेतकरी/शेतकरी गट/शेतकरी उत्पादक कंपनी/शेतकरी उत्पादक सहकारी संस्था यांच्या सभासदांचा माल ग्राहकांना थेट विक्री करण्याचे बंधन राहणार आहे.

या आठवडी बाजारासाठी शासनाने महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांच्यावर संपूर्णः जबाबदारी टाकलेली आहे. महानगरपालिकेला मागणी केल्या प्रमाणे महानगरपालिका क्षेत्रामधील विविध ठिकाणांवर ज्या ठिकाणी सर्वाची संमती असेल, नागरीकांना सुविधा असेल अशा ठिकाणी संत शिरोमणी श्री.सावता माळी शेतकरी आठवडी बाजार एक दिवस बाजार भरणेसाठी मान्यता देणेसाठी व बाजाराच्या जागेची स्वच्छता देण्याच्या अटीवर विनामुल्य उपलब्ध करून देणेसाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.रेणुकादास वैद्य :अशा जागा देण्यासाठी कुठल्या भागातून मागणी करण्यात आली का? हा प्रस्ताव मंजूर करणार मार्केट उभे राहणार, मा.पोलीस आयुक्त यांनी हातगाड्या

काढण्याचा निर्णय घेतला. दोन दिवसांसाठी स्टेट बँक कॉलनी भागात मोकळ्या जागेवर हातगाड्या उभ्या करण्याचा निर्णय घेतला. वर्ष झाले त्या हातगाड्या तेथून निघायला तयार नाहीत. तेथेच लोक दारू पितात, कचरा टाकतात, त्याचा नागरीकांना त्रास होतो. अशा जागा देतांना त्या भागातील सदस्यांनी मागणी केली का? स.सदस्यांची व नागरीकांची मान्यता असेल तर असा ठराव करण्यास हरकत नाही. म.रा.कृषी पणन मंडळ यांनी त्या वार्डाचे स.सदस्य व नागरीकांशी प्रत्यक्ष चर्चा करावी. स्पॉटवाईज प्रस्ताव यावा. योजना चांगली आहे. शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. असा एकत्रित प्रस्ताव मंजूर करणे योग्य नाही.

श्रीमती माधुरी देशमुख :कोणत्या जागेवर परवानगी देणार? शहर व सिडकोत किती ओपनस्पेस आहे? जेथे गार्डन व वृक्षारोपण विकसीत झाले. अशा ठिकाणी जागा देऊ नये. या कृषी पणन मंडळास जागा मोफत देतो. शेतकऱ्याकडून ते पैसे घेणार का? घेणार नसतील तर जागा देण्यास हरकत नाही.

श्री.अब्दुल नाईकवाडी :अर्धवट प्रस्ताव आलेला आहे जागा कोणती आहे. आठवड्यातून एक दिवस बाजार भरणार, उर्वरीत दिवशी तेथे काय उपभोग घेता येणार आहे? दुरूस्तीसह प्रस्ताव यावा.

श्री.नंदकुमार घोडेले :उपक्रम चांगला आहे. यात नेमके मनपाने काय करायचे? काय सुविधा देण्यात येईल? एनओसी द्यायची की, जागेसह मनपाला कोणत्या सुविधा द्याव्या लागणार आहे? सविस्तर समोर यावे.

श्री.विकास एडके :किती जागा पाहिजे, मनपास काय फायदा होणार? कोणत्या सुविधा देणार आहे? सविस्तर यावे.

श्री.मनगटे गजानन :शहरात जेथे आठवडी बाजार भरतात, तेथे शेतकरी माल विकतात. पार्कीगची अडचण येते. राज्य कृषी पणन मंडळास जागा देणार. ते शेतकऱ्यांना मोफत जागा व सुविधा देणार असेल, तर मंजूर करण्यास हरकत नाही. यात एजन्सी पार्टनर असणार का? शेतकऱ्यांना काय सुविधा देणार आहे?

कार्य.अभि.श्री.कोल्हे :त्या त्या भागातील स.सदस्य व तेथील नागरीकांची एनओसी घेऊन हा बाजार भरवावा. अशी संकल्पना राहील.

श्री.गजानन मनगटे :शासनाने परिपत्रक काढले, ते कम्पलसरी लागू करणे आवश्यक आहे का? ज्यांची मागणी आहे तेथे मान्यता द्यावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :जागेची मागणी केली आहे. ज्या जागा खुल्या असतील तेथील कुणाचा विरोध नाही. अशी जागा द्यावी. असे म्हटले आहे. शेतकऱ्यांचा माल डायरेक्ट ग्राहकांपर्यत पोहचविणेसाठी ही योजना आहे. कमी दरामध्ये टेंन्ट आणि ग्रेंट हे शासन त्यांना देणार असून तेथील साफसफाई करण्याची जबाबदारी सुध्दा कृषी पणन मंडळाने घेतली आहे. त्यामूळे ज्या ठिकाणी नागरीकांना आवश्यकता आहे त्या वार्डाचे स.सदस्याशी चर्चा करून तेथील जागा निश्चित करून कार्यवाही करावी.

श्री.दिलीप थोरात :प्रायोगिक तत्वावर सुरू करावे. भविष्यात योग्य वाटत असेल तर चालू ठेवता येईल. मंजूर करावे.

श्री.नंदकुमार घोडेले :खुल्या जागेत शेड नाही. पावसाळ्यात तेथे बाजार भरू शकतील का? पुर्ण बांधकाम करून मनपाचा खर्च करावा लागणार आहे.

मा.महापौर :स.सदस्यांनी सुचना केल्यानुसार ज्या ठिकाणी मागणी असेल तसेच नागरीकांना त्रास होणार नाही. त्यांना विश्वासात घेऊन जागा निश्चित करावी. शेतकऱ्यांचा माल डायरेक्ट येतो म्हणून शेतक-यास भुर्दंड पडू नये शेतकऱ्यांच्या नावाखाली ब्रोकर किंवा इतर मध्यस्थीने विक्री करू नये. डायरेक्ट शेतकऱ्यांना फायदा मिळावा. त्या अनुषंगाने प्रशासनाने शहानिशा करून कार्यवाही करावी. प्रस्तावास दुरूस्तीसह मंजूरी देण्यात येते.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र./-३५३/नवि-२०, मंत्रालय, मुंबई-४००-०३२, दि.२४.०८.२०१६ नुसार महाराष्ट्र शासनाच्या वतीने संत शिरोमणी श्री.सावता माळी शेतकरी आठवडी बाजार एक दिवस बाजार भरणेसाठी मान्यता देणेसाठी व बाजाराच्या जागेची स्वच्छता करून देण्याच्या अटीवर तसेच स.सदस्यांनी सुचना केल्यानुसार जागा निश्चित करुन शेतकऱ्याच्या नावाखाली ब्रोकर किंवा इतर मध्यस्थी न करता डायरेक्ट शेतक-यांना फायदा मिळावा या अनुषंगाने प्रशासनाने शहानिशा करून विनामुल्य उपलब्ध करून देणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०६, कांचनवाडी येथे असलेली मनपाची बालवाडी शाळा ही अत्यंत जुनी व टिनची आहे. सदरील शाळेच्या भिंती व पत्रे फार खराब झालेले आहे. या ठिकाणी गोरगरीबांचे मुले/मुली शिक्षण घेत असल्याने त्यांना चांगल्या प्रकारे शिक्षण मिळण्यासाठी सदरील बालवाडी शाळेची जुनी इमारतीच्या ठिकाणी नविन बांधकाम करून दोन मजली शाळा बांधल्यास येथे शाळेत विद्यार्थी संख्येत वाढ होईल व जुन्या शाळेच्या खराब भिंती व टिनची भिंती विद्यार्थ्यांत राहणार नाही.

करीता, वॉर्ड क्र.१०६, कांचनवाडी येथील मनपा बालवाडीची जुनी इमारतीच्या ठिकाणी नवीन दोन मजली शाळा बांधण्यास तथा त्या अनुषंगाने येणाऱ्या संभावित खर्चास मान्यता मिळविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती विमल जनार्धन कांबळे **अनुमोदक:-** श्री.सिताराम इसराम सुरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०६, कांचनवाडी येथील मनपा बालवाडीच्या जुन्या इमारतीच्या ठिकाणी नवीन दोन मजली शाळा बांधण्यास तसेच सदरील कामासाठी त्या अनुषंगाने येणाऱ्या संभावित खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पातील खालील काम रद्द करून प्रभागात आवश्यक असणारे दुसरे विकास कामे करणे बाबत स्थळ बदलाचा व लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात एससीआर गार्डन पान क्र.५८ अनुक्रमांक २८ वर | १. वॉर्ड क्र.६५ अंतर्गत विविध विकास कामे करणे. र.रु.१०.०० लक्ष. |

| | | |
|---|---|---|
| | सुराणानगर वॉर्ड अंतर्गत एमजीएम जवळील असलेले उद्यान व लॉन विकसीत व संगोपन करणे. र.रु.२५ लक्ष. | २. वॉर्ड क्र.६५ अंतर्गत एन-१ व मोतीवालानगर येथील ड्रेनेज लाईन बदलणे. र.रु.१५.०० लक्ष. |

**सुचक:-** श्रीमती राखी प्रशांत देसरडा **अनुमोदक:-** श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पातील खालीलप्रमाणे कामाचे लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात एससीआर गार्डन पान क्र.५८ अनुक्रमांक २८ वर सुराणानगर वॉर्ड अंतर्गत एमजीएम जवळील असलेले उद्यान व लॉन विकसीत व संगोपन करणे. र.रु.२५ लक्ष. | १. वॉर्ड क्र.६५ अंतर्गत विविध विकास कामे करणे. र.रु.१०.०० लक्ष.<br>२. वॉर्ड क्र.६५ अंतर्गत एन-१ व मोतीवालानगर येथील ड्रेनेज लाईन बदलणे. र.रु.१५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.३४, आरतीनगर-मिसरवाडी मध्ये येणाऱ्या दलित वसाहतीमध्ये शासनाच्या दलितवस्ती सुधार योजने अंतर्गत वॉर्ड क्र.३४, आरतीनगर-मिसरवाडी भागामध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकण्याकरीता र.रु.५० लक्ष प्राप्त होण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती संगिता सुभाष वाघुले **अनुमोदक:-**श्रीमती आशा विजय निकाळजे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.३४, आरतीनगर-मिसरवाडी येथे शासनाच्या दलितवस्ती सुधार योजने अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकण्याकरीता र.रु.५० लक्ष निधी उपलब्ध होण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४४, सिकंदर पार्क व जमात-ए-इस्लामी ऑफीस समोर पोलसह हायमास्ट फिटींग व विविध ठिकाणी पोल शिफ्टींग करणे सदरील काम अर्थसंकल्प सन २०१६-१७ च्या सर्वसाधारण सभेने शिफारस केलेल्या कामामधुन नविन कॉंक्रीट शहरी भाग GBR-ward-C पान क्र.०२, अनु.क्र.०१, वॉर्ड क्र.४४ अंतर्गत विविध ठिकाणी ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे. अ.प.र.रु.२५.०० लक्षची तरतुद उपलब्ध आहे.

करीता, कॉंक्रीटच्या कामाऐवजी विषयांकित कामाची वळती करणेसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी **अनुमोदक:-**श्रीमती नसीम बी सांडू खॉ

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४४, सिकंदर पार्क व जमात-ए-इस्लामी ऑफीस समोर पोलसह हायमास्ट फिटींग व विविध ठिकाणी पोल शिफ्टींग करणे सदरील काम अर्थसंकल्प सन २०१६-१७ च्या सर्वसाधारण सभेने शिफारस केलेल्या कामामधुन नविन कॉंक्रीट शहरी भाग GBR-ward-C पान क्र.०२, अनु.क्र.०१, वॉर्ड क्र.४४ अंतर्गत विविध ठिकाणी ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे. अ.प.र.रु.२५.०० लक्षच्या उपलब्ध तरतुदीमधून करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०९, मयुरनगर, सुदर्शननगर मधील खालील दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्षक बदलण्या बाबतच्या प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र | पान क्र. | जुने कामाचे नाव | नविन कामाचे नाव |
|---|---|---|---|
| ५६ | SCR-WARD-B P.No.14 | वॉर्ड क्र.०९ अंतर्गत गजानननगर अंतर्गत कॉंक्रीट रस्ता तयार करणे.<br>रक्कम रुपये १० लक्ष. | १. त्याऐवजी वॉर्ड क्र.०९, मयुरनगर, सुदर्शननगर येथे सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे.<br>रक्कम रुपये ०७ लक्ष.<br>२. वॉर्ड क्र.०९ अंतर्गत एन-११ भाजीमंडी येथे हायमास्ट (लाईट) बसविणे.<br>रक्कम रुपये ०३ लक्ष. |

**सुचक:-**श्रीमती स्वाती किशोर नागरे **अनुमोदक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव

श्री.गजानन बारवाल :स्वेच्छा निधीतून किंवा टेंडर नुसार सर्व वार्डात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास परवानगी दयावी.

मा.महापौर :स.सदस्यांची सुचना लक्षात घेऊन कायदेशीर बाबी विचारात घेऊन कार्यवाही करावी. हा विषय मंजूर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०९, मयुरनगर, सुदर्शननगर मधील खालील दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजूरी देण्यात येते.

| अ.क्र | पान क्र. | जुने कामाचे नाव | नविन कामाचे नाव |
|---|---|---|---|
| ५६ | SCR-WARD-B P.No.14 | वॉर्ड क्र.०९ अंतर्गत गजानननगर अंतर्गत कॉंक्रीट रस्ता तयार करणे.<br>रक्कम रुपये १० लक्ष. | १. त्याऐवजी वॉर्ड क्र.०९, मयुरनगर, सुदर्शननगर येथे सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे.<br>रक्कम रुपये ०७ लक्ष.<br>२. वॉर्ड क्र.०९ अंतर्गत एन-११ भाजीमंडी येथे हायमास्ट (लाईट) बसविणे.<br>रक्कम रुपये ०३ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी., चिकलठाणा या प्रभागातील कामासाठी अर्थसंकल्पातील असलेली तरतुद खालील दर्शविल्याप्रमाणे वळती करण्यात यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पा.नं.व अ.क्र. | कामाचे नाव | सुधारित कामाचे नाव |
|---|---|---|
| नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग वॉर्ड-ई स्पिल पान क्र.५० अ.क्र.२६ | वॉर्ड क्र.२३ मसनतपुर येथे संजय शिंदे यांच्या घराजवळील विविध गल्ल्यांमध्ये कॉंक्रीटींग करणे रक्कम रु.२५.०० लक्ष | वॉर्ड क्र.३८ एम.आय.डी.सी. चिकलठाणा अंतर्गत एन-१ सिडको सेक्टर-ए येथे वॉल-टु-वॉल रस्त्याचे डांबरीकरण करणे रक्कम रु.२५.०० लक्ष |

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-**श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी., चिकलठाणा या प्रभागातील कामासाठी अर्थसंकल्पातील असलेली तरतुद खालील दर्शविल्याप्रमाणे वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अर्थसंकल्प पा.नं.व अ.क्र. | कामाचे नाव | सुधारित कामाचे नाव |
|---|---|---|
| नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग वॉर्ड-ई स्पिल पान क्र.५० अ.क्र.२६ | वॉर्ड क्र.२३ मसनतपुर येथे संजय शिंदे यांच्या घराजवळील विविध गल्ल्यांमध्ये कॉंक्रीटींग करणे रक्कम रु.२५.०० लक्ष | वॉर्ड क्र.३८ एम.आय.डी.सी. चिकलठाणा अंतर्गत एन-१ सिडको सेक्टर-ए येथे वॉल-टु-वॉल रस्त्याचे डांबरीकरण करणे रक्कम रु.२५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील समाविष्ट कामांचे लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र. | अंदाजपत्रकातील अ.क्र.मुळ काम | रक्कम | सुधारित काम | रक्कम लाखात |
|---|---|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.११४ अंतर्गत मधुबन हॉटेल समोरील बीड बायपास पासून खडीकरण करणे. GBR/WA-F Page No.०३ अ.क्र.१३ | ०३.०० | वॉर्ड क्र.११४ देवळाई अंतर्गत विविध ठिकाणी खडीकरण करणे. | ०६.०० |
| ०२ | वॉर्ड क्र.११४ श्री.शहाणे यांच्या दुकानापासून ते पाण्याच्या टाकी पर्यंत हरिप्रसादनगर व हरिप्रसाद मधील हरिकृपानगर येथील अंतर्गत रस्ते खडीकरण करणे. GBR/WA-F Page No.०३ अ.क्र.२० | ०३.०० | | |

**सुचक:-**श्री.अप्पासाहेब विनायकराव हिवाळे **अनुमोदक:-**श्रीमती ज्योती सुनिल नाडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.११४ अंतर्गत सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील खालील प्रमाणे समाविष्ट कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अंदाजपत्रकातील अ.क्र.मुळ काम | रक्कम | सुधारित काम | रक्कम लाखात |
|---|---|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.११४ अंतर्गत मधुबन हॉटेल समोरील बीड बायपास पासून खडीकरण करणे. GBR/WA-F Page No.०३ अ.क्र.१३ | ०३.०० | वॉर्ड क्र.११४ देवळाई अंतर्गत विविध ठिकाणी खडीकरण करणे. | ०६.०० |
| ०२ | वॉर्ड क्र.११४ श्री.शहाणे यांच्या दुकानापासून ते पाण्याच्या टाकी पर्यंत हरिप्रसादनगर व हरिप्रसाद मधील हरिकृपानगर येथील अंतर्गत रस्ते खडीकरण करणे. GBR/WA-F Page No.०३ अ.क्र.२० | ०३.०० | | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९३९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१४, पडेगाव भागात दलित वस्ती योजनेअंतर्गत विविध विकासाची कामे करणे आवश्यक आहे. या भागातील रस्ते अत्यंत खराब झालेले असून रस्त्याचे डांबरीकरण करणे आवश्यक आहे. वॉर्ड क्र.१४ हा वॉर्ड अनुसूचित जातीसाठी राखीव वॉर्ड आहे. या भागात अत्यंत गरीब नागरीक राहत असून मुलभूत सोई-सुविधा पासून अनेक वर्षापासून वंचित आहेत. त्यांना सोई-सुविधा पुरविणे आवश्यक आहे.

करीता, दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील कामे करण्यासाठी रक्कम रुपये ५०.०० लक्ष निधी उपलब्ध करून देणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.१४ पडेगाव येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे (रक्कम रुपये ३०.०० लक्ष)
२. वॉर्ड क्र.१४ पडेगाव अंतर्गत माजी सैनिक कॉलनी येथे सिमेंट रस्ते तयार करणे. (रक्कम रुपये २०.०० लक्ष).

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ **अनुमोदक:-**श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१४, पडेगाव भागात दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत वॉर्ड क्र.१४ पडेगाव येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे (रक्कम रुपये ३०.०० लक्ष) व वॉर्ड क्र.१४ पडेगाव अंतर्गत माजी सैनिक कॉलनी येथे सिमेंट रस्ते तयार करणे (रक्कम रुपये २०.०० लक्ष) असे एकूण रुपये ५० लक्षचा निधी उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>ऐनवेळीचे विषय</u>**

**<u>विषय क्रमांक ९४०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७७ हेडगेवार रूग्णालय ते बँक ऑफ इंडिया पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीट करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन २०१५-२०१६ नुसार र.रू.८४,८१,४५०/-चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.०६/०३/२०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प २०१६-२०१७ जी.बी.आर.वार्ड-फ, पृष्ठ क्र. ०६ अ.क्र.०३ व जी.बी.आर वार्ड-फ पृष्ठ क्र.०७ अ.क्र.३९ नुसार तरतुद उपलब्ध आहे. करिता, सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रू.८४,८१,४५०/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजूर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७७ मध्ये हेडगेवार रूग्णालय ते बँक ऑफ इंडिया पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीट करणेच्या कामाचे र.रू.८४,८१,४५०/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, घनकचरा संकलनाच्या कामासाठी महानगरपालिकेची यंत्रणा कमी पडत असल्यामुळे एका वर्षासाठी एकूण ४७ लोडींग रिक्षा किरायाने घेण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक-११८ दिनांक २०.०८.२०१५ नुसार एकुण रक्कम रुपये १,६१,३०,४००/- च्या अंदाजपत्रकास मान्यता झाल्यानंतर निविदा कार्यवाही करण्यात आली. एकुण ०६ वेळेस निविदा मागविण्यात आल्या. नंतर निविदा कार्यवाही अंतिम झाली व मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक-२० दिनांक ०४.०८.२०१६ नुसार मे.ॲक्टीव्ह मोटर्स औरंगाबाद यांची खालील प्रमाणेच्या दरानुसार नियुक्ती करण्यात आली.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | प्रतिदिन/प्रति लोडींग ॲटो |
|---|---|---|
| १ | लोडींग ॲटो ३ चाकी | ८००/- |
| २ | लोडींग ॲटो ४ चाकी | ९००/- |

प्रथमत: ४७ लोडींग ॲटो किरायाने घेण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. तथापि, वेळोवेळी घनकचरा कक्ष, वॉर्ड अधिकारी, स.नगरसेवक यांचे मागणी प्रमाणे तसेच स्वच्छ भारत अभियान अंतर्गत डोअर-टू-डोअर कचरा कलेक्शन करण्यासाठी प्रति निवडणुक वॉर्ड दोन रिक्षा या प्रमाणे नियोजन करण्यासाठी एकुण ११५ निवडणुक वॉर्डासाठी २३० लोडींग रिक्षांची आवश्यकता होती. यामध्ये महानगरपालिकेच्या मालकीच्या ५८ रिक्षा असल्यामुळे उर्वरित १७१ लोडींग ॲटो किरायाने घेण्यात आल्या. परिणामी भाडेतत्वावरील लोडींग रिक्षाच्या खर्चात वाढ झालेली त्यामुळे माहे ऑगस्ट-२०१६ ते डिसेंबर-२०१६ या काळात एकुण १,८३,५५,१००/- इतका खर्च झाला आहे. तसेच माहे जानेवारी २०१७ पासून महानगरपालिकेने नवीन ५० लोडींग ॲटो (हायड्रोलिक) खरेदी केल्यामुळे किरायाच्या सर्वसाधारणपणे एकुण ५० लोडींग ॲटो बंद करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सर्वसाधारणपणे १२५ किरायाच्या रिक्षा सद्यस्थितीत कार्यरत ठेवाव्या लागतील असे अनुमान आहे. सदरील कामाची मुदत दिनांक ०३.०८.२०१७ पर्यंत असून वरील प्रमाणेच्या मंजुर दरानुसार प्रतिमाह साधारणपणे ३० लक्ष प्रमाणे पुढील सात महिन्यांसाठी र.रु.२१० लक्ष खर्च अपेक्षीत आहे.

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.११८ दिनांक २०.०८.२०१५ नुसार एका वर्षासाठी रक्कम रुपये १,६१,३०,४००/- लक्षच्या खर्चास मान्यता मिळाली आहे. तथापि, वरील प्रमाणे प्रत्यक्षात रक्कम रुपये ३,९३,५५,१००/- लक्ष खर्च अपेक्षीत आहे. करीता, मंजुर अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,६१,३०,४००/- लक्ष वजा जाता अपेक्षीत रक्कम रुपये २,३२,२४,७००/- लक्षच्या अतिरीक्त खर्चास मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजूर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा संकलनाच्या कामासाठी महानगरपालिकेची यंत्रणा कमी पडत असल्यामुळे घनकचरा कक्ष वॉर्ड अधिकारी, स.नगरसेवक यांचे मागणी प्रमाणे तसेच स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सर्वसाधारणपणे १२५ किरायाच्या रिक्षा सद्यस्थितीत कार्यरत ठेवाव्या लागतील. दिनांक ०३.०८.२०१७ पर्यंत मंजुर दरानुसार प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे प्रत्यक्षात रक्कम रुपये ३,९३,५५,१००/- लक्ष खर्च अपेक्षीत असुन सर्वसाधारण सभा ठराव क्र.११८ दिनांक २०.०८.२०१५ अन्वये

मान्यता मिळाल्यानुसार मंजुर अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,६१,३०,४००/- लक्ष वजा जाता अपेक्षीत रक्कम रुपये २,३२,२४,७००/- लक्षच्या अतिरीक्त खर्चास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवर आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ नुसार डॉ.जयश्री कुलकर्णी यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्या रजेवर असतांना श्री.सुहास जगताप हे मनपात रुजू झाल्याचे ज्ञात आहे.

त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार डॉ.जयश्री कुलकर्णी यांना सुध्दा आरोग्य वैद्यकीय अधिकारी म्हणुन अधिनियमाचे कलम ६७ (३) (सी) नुसार वेतन अदा करण्यात आलेले आहे. हे नियमाविरुध्द आहे. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार डॉ.जयश्री कुलकर्णी यांना सुध्दा त्याच पदावर उर्वरित कालावधीतील वेतन अदा करावे लागणार आहे. महानगरपालिका प्रशासनाने प्राप्त नसलेल्या अधिकाराचा दुरूपयोग करून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केले आहे. मुख्यलेखापरिक्षक यांनी एकाच पदावर दोन व्यक्तींना वेतन अदा करण्याची कृती नियमबाह्य असल्याचा खुलासा मा.सर्वसाधारण सभेत सादर केलेला आहे.

वरील बाब विचारात घेता, अधिकाराचा दुरूपयोग केल्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून नुकसान भरपाई वसुल करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-**श्री.गोकूळसिंग संपतसिंग मलके

श्री.राजेंद्र जंजाळ :डॉ.सुहास जगताप यांना शासनाने येथे पाठविले होते. त्यावेळी घनकचरा व्यवस्थापनाचे प्रमुख म्हणून जो बायोमेडिकल वेस्टच्या संदर्भात जी अनियमितता झाली होती म्हणून डॉ.जयश्री कुलकर्णी यांना सक्तीच्या रजेवर पाठविले होते. त्यावेळी सभागृहात त्यांचे बाबतीत अनेक प्रश्न उपस्थित केले गेले. बायोमेडीकल वेस्ट डिसपोज करतांना, शासनाने जे नियम घालून दिले होते ते नियम न पाळता डिसपोजल होत होते. त्याचा ठपका ठेवून डॉ.कुलकर्णी यांना सक्तीच्या रजेवर पाठविले होते. त्याची जी चौकशी लावली होती. त्या चौकशीचा अहवाल अद्याप आला नाही. त्यांचेकडे जी पदवी आहे. कोर्स केला. त्या कालावधीत त्या मनपात कार्यरत होत्या. त्या चौकशीचा अहवाल सुध्दा आला नाही. नेमकी या प्रकरणात चुक कोणाची? जबाबदारी कशी निश्चित करणार आहे? खुलासा करावा.

श्री.राजू शिंदे :एखाद्या अधिकाऱ्याला वेतन अदा करणेसाठी ६७(३) क च्या नियमाचा वापर करण्याची आवश्यकता नव्हती. एकाच पदावर काम करणारे दोन अधिकारी यांना पगार देता येत नाही. असे सभेत त्यावेळी मुख्य लेखा परीक्षक यांनी म्हटले होते. दोन अधिकारी यांना एकाच पदाचा पगार देता येतो का? देता येत नसेल तर ते वसुली करावी लागेल की नाही जर ऑडीट मध्ये येत असेल तर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. चौकशी समिती नेमावी. जे दोषी असेल त्यांचे कडून पगार वसुल करावा. डॉ.जगताप हे हेल्थ विभागाकडून आले, नगरविकास विभागाकडून यायला पाहिजे होते. त्यांना रूजू करून घेणे आवश्यक होते का? तसेच डॉ. जयश्री कुलकर्णी यांचे साठी वेगळे पद निर्माण करून त्या पदावर नियुक्ती केली. ते आयुक्तांना करता येते का? ते शासनाचे

अधिकार होते. चौकशी समिती नियुक्त करावी. मुख्य लेखा परीक्षक यांना नियुक्त करावे.

श्री.राजंद्र जंजाळ :यापुर्वी चौकशी समिती नेमली होती. त्यांचा अहवाल अद्याप का दिला नाही?

मा.महापौर :प्रशासनाने या सर्व प्रकरणाची शहानिशा करून नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी. स.श्री.राजेंद्र जंजाळ यांनी जी सुचना मांडली त्या चौकशीचा अहवाल पुढील सभेत ठेवावे.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवरील आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.जयश्री कुलकर्णी रजेवर असतांना श्री.सुहास जगताप हे मनपात रुजू झाले होते. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार डॉ.जयश्री कुलकर्णी यांना सुध्दा आरोग्य वैद्यकीय अधिकारी म्हणुन अधिनियमाचे कलम ६७ (३) (सी) नुसार वेतन अदा करण्यात आलेले असुन मुख्यलेखापरिक्षक यांनी एकाच पदावर दोन व्यक्तींना वेतन अदा करण्याची कृती नियमबाह्य असल्याचा खुलासा सर्वसाधारण सभेत सादर केला. ही बाब विचारात घेता, अधिकाराचा दुरूपयोग केल्यामुळे महानगरपालिकेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीस जबाबदार अधिकाऱ्यांवर नियमाप्रमाणे जबाबदारी निश्चित करून नुकसान भरपाई वसुल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४९, भडकलगेट येथे नागरीकांच्या वारंवार मागणीनुसार व त्यांच्या सोई-सुविधेसाठी खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

| जुना लेखाशिर्ष | आता करावयाचे कामाचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.४९, भडकलगेट अंतर्गत चर्च समोरील ड्रेनेज लाईन बदलणे. रक्कम रुपये १०.०० लक्ष पान क्र.ले-आऊट वर्क पान क्र.०३ | टाऊन हॉल उड्डाणपुलाच्या बाजुला साईड रोडचे व्हाईट टॉपींग करणे. अ.प.र.रु.१०.०० लक्ष. |

**सुचक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे **अनुमोदक:-**श्री.विकास प्रकाश एडके

मा.महापौर :विषय मंजूर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९, भडकलगेट येथे नागरीकांच्या वारंवार मागणीनुसार व त्यांच्या सोई-सुविधेसाठी खालील लेखाशिर्ष बदलण्यास मंजूरी देण्यात येते.

| जुना लेखाशिर्ष | आता करावयाचे कामाचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.४९, भडकलगेट अंतर्गत चर्च समोरील ड्रेनेज लाईन बदलणे. रक्कम रुपये १०.०० लक्ष पान क्र.ले-आऊट वर्क पान क्र.३ | टाऊन हॉल उड्डाणपुल बाजुला साईड रोडचे व्हाईट टॉपींग करणे. अ.प.र.रु.१०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६३ मधील अविष्कार कॉलनी मधील स्थायी समितीने शिफारस केलेल्या नवीन काम एस.सी.आर.वॉर्ड-ब पेज नं.१२, अ.क्र.२६, वॉर्ड क्र.६३ अंतर्गत विविध

ठिकाणी काँक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.३० लक्ष या बजेटमधील उरलेल्या र.रु.२.५० हजार रुपयांमध्ये चिस्तीया कॉलनी मधील नवीन ड्रेनेज लाईन टाकण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण समेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अब्दुल रहीम शेख नाईकवाडी **अनुमोदक:-**श्री.अजीम अहेमद रफिक

मा.महापौर :विषय मंजूर. नियमानुसार कार्यवाही करावी.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६३ मधील अविष्कार कॉलनी मधील स्थायी समितीने शिफारस केलेल्या नवीन काम एस.सी.आर.वॉर्ड-ब पेज नं.१२, अ.क्र.२६, वॉर्ड क्र.६३ अंतर्गत विविध ठिकाणी काँक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.३० लक्ष या बजेटमधील उरलेल्या र.रु.२.५० हजार रुपयांमध्ये चिस्तीया कॉलनी मधील नवीन ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९४५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मध्यवर्ती जकात नाका या ठिकाणी रिकामे पडलेले मनपाचे गोडाऊन सेवाभावी संस्थांना भाडेतत्वावर देऊन या ठिकाणी फक्त मासे, चिकन, मटन व भाजी मार्केट करीता दुकाने चालवणेसाठी जागा सेवाभावी संस्थांना मनपाने ठरवून दिलेल्या भाड्यावर देण्यात यावी व जे लोक मध्यवर्ती जकात नाक्यावर मासे, चिकन, मटन व भाजी विकतात त्यांनाच शहानिशा करून व अटी व शर्ती ठरवून भाडेतत्वावर देण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अब्दुल रहीम शेख नाईकवाडी **अनुमोदक:-**श्री.अजीम अहेमद खान

श्री.नंदकुमार घोडेले :महापालिकेचे मासळी व मटन मार्केट प्रस्तावित आहे. शासनाच्या निधीतून मासळी मार्केट करीत आहोत. या जागेवर महापालिकेचा दुसरा उपक्रम सुरू करावा. सेवा भावी संस्थेला देणे करीता वेगळ्या इमारती आपण बांधत आहोत. मासळी मार्केटचा प्रोजेक्ट सुरू आहे. मला लेखी उत्तर दिले. मार्केट तयार आहे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :केंद्र शासनाची स्कीम होती. त्यातून मासळी मार्केट केले. परंतु या ठिकाणी लोक रस्त्यावर मांस, मच्छी विक्री करतात. हे शहर स्मार्ट सिटीकडे जात आहे. हे शहर चांगले व स्वच्छ दिसावे यासाठी या लोकांना मनपाच्या आतिल जागेवर परवानगी द्यावी.

श्री.नंदकुमार घोडेले :राज्य शासनाच्या निधीतून मासळी मार्केट बांधलेले आहे. ४८ ओटे आहे. निविदा काढली कुणीही आधारभूत रक्कमेपेक्षा जास्त रक्कम देण्यास तयार नाही. आधारभूत रक्कमेनुसार मासळी मार्केटधारक यांना विनंती केली असता, ते दुकान घेणेस तयार नाही. असे असतांना ही चांगली जागा देण्याची गरज नाही. एकतर इलिगल रस्त्यावर विक्री करतात. म्हणून अशा जागा देणार का? अशा जागा देणार असेल तर सर्व भागातील लोकांना जागा द्याव्यात.

श्री.गजानन मनगटे :सिडको प्रशासनाला विचारणा करावी की, तेथे जागा आहेत का? तेथील अतिक्रमण काढून मार्केट बनविता येईल का ते पहावे.

श्री.अफसर खान :आतिल भागात जागा देऊन मार्केट केले तर रस्त्यावर विक्री करणार नाही. ती जागा देऊ शकतो. यापुर्वी अनेक सस्थांना जागा दिलेल्या आहे. विरोध होऊ नये.

श्री.नंदकुमार घोडेले :मटन, मासळी मार्केट, कत्तलखाने शासनाच्या निधीतून प्रस्तावित आहे. चांगल्या ठिकाणी मार्केट होत आहे तेथे त्यांनी विक्री करावे.

कार्य.अभि.(श्री कोल्हे) :शासनाच्या निधीतून शहागंज येथे मासळी मार्केट तयार केले आहे. तीन वेळेस निविदा काढली. या लोकांना येथील गाळे घेण्याबाबत विनंती केली होती त्यांनी घेतले नाही.

श्री.अफसर खान :त्या लोकांना असे सांगण्यात आले की, गाळे शिल्लक नाही.

श्री.अब्दुल नाईकवाडी :शहांगज मध्ये सिडको-हडको भागातील लोकांना येण्यासाठी मोठा खर्च लागतो. रस्ता अरूंद आहे. ट्रॅफिक आहे. जे शॉप केले ते लिमीटेड व्यापारीकरीता आहे. शहांगज व्यतिरिक्त सेंट्रल नाका येथे मार्केट करण्यास हरकत नसावी. रस्त्यावर विक्री करतात. विकासामध्ये अडचण येते. यास मंजूरी द्यावी. सिडको हस्तांतर झाले र.रु.२०० कोटीच्या मिळकती मनपास दिल्या होत्या. आज त्या जागेवर अतिक्रमण झाले.

मा.आयुक्त :शहांगज येथे मार्केट केले. ते स्पेसिफिक एक परपज साठी बांधले जे सेंट्रल नाका येथे मासळी, मटन विक्री करतात ते लोक मला भेटले. त्यांचे म्हणणे असे की, शहांगज मध्ये आम्हाला शॉप दिले तर तेथे व्रिकी होणार नाही. जवळच मार्केटसाठी जागा द्यावी. त्यांना शहांगज हे ठिकाण लांब पडते. हे बरोबर आहे. त्यावर एक महिन्याकरीता सुरू करावे. लॉस झाला तर विचार करू. असे त्यांना सांगितले. सेन्ट्रल नाका येथे विक्री जास्त होते. जर मनपाच्या फंडातून इतर ठिकाणी मार्केट केले तर एका ठिकाणी जास्त गर्दी होणार नाही.

श्री.राजू शिंदे :या बाबतीत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.नासेरी सिध्दीकी :सेंन्ट्रल नाका ही जुने व नवीन शहराच्या मध्यभागी आहे. मंजूर करावे.

श्री.जफर खान :ही जागा शहराच्या मध्यभागी आहे. त्या विक्रेत्यांना दुकाने मिळतील. मंजूर करावे. पार्कींगसाठी व्यवस्था होईल.

श्री.अय्युब जागीरदार :ज्यांना गरज आहे, त्यांना वैयक्तिक ती दुकाने मिळावी. सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून देऊ नये. संस्थेला दिल्यास ते त्यांचे पैसे कमवतील. मनपास फायदा होणार नाही.

श्रीमती समीना शेख :शहांगज येथील मार्केट लिजवर आहे. मालक व मनपा कोर्टात वाद चालू आहे. लिज संपल्यानंतर काय करणार आहे? ती जागा आपली आहे का?

कार्य.अभियंता-बीओटी :शहांगज मार्केट लिजवर आहे. २२ वर्षासाठी लिजवर आहे. लिज वाढविण्याचे अधिकार मनपास आहे. जागा लिजवर आहे. ज्यांची जागा त्यांना मोबदला पाहिजे.

श्रीमती समीना शेख :जर जागा मालकाकडून मा.कोर्टाने निर्णय दिला तर पुढे काय नियोजन असणार आहे? प्रशासन दिशाभुल करीत आहे. जर लिज वाढवायची असती तर न्याय प्रविष्ठ प्रकरण झाले नसते. जो प्रस्ताव आला त्यास मंजुरी द्यावी. पुढच्या साठी हा पर्याय राहिल.

श्री.नंदकुमार घोडेले :या ठिकाणी हॉस्पीटल करणार भुमिपुजन झाले होते, ते काम का थांबलेले आहे?

मा.महापौर :सर्व सदस्यांचे मत विचारात घेऊन, तसेच शहांगज येथे मोठे मार्केट तयार केले त्या ठरावाचा व इतर सर्व बाबी तपासून प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मध्यवर्ती जकात नाका या ठिकाणी रिकामे असलेले मनपाचे गोडाऊन नियमाप्रमाणे सेवाभावी संस्थांना भाडेतत्वावर देऊन या ठिकाणी फक्त मासे, चिकन, मटन व भाजी मार्केट करीता दुकाने चालवणेसाठी जागा सेवाभावी संस्थांना मनपाने ठरवून दिलेल्या भाड्यावर देण्यास व जे लोक मध्यवर्ती जकात नाक्यावर मासे, चिकन, मटन व भाजी विकतात त्यांनाच नियमाप्रमाणे सर्व शहानिशा करून यापुर्वी शहागंज येथे मार्केट तयार केले त्या ठरावाचा विचार करून व इतर बाबी तपासून घेऊन नियमानुसार आवश्यक कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक ९४६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा सर्वसाधारण सभा दिनांक २९.१२.२०१६ मधील मंजुर विषय क्रमांक-८१९ अन्वये मुस्लीम कब्रस्तान, स्मशानभुमी तसेच स्व.बाळासाहेब ठाकरे बोटॅनिकल गार्डन येथे नियमानुसार सुरक्षा रक्षक देण्याची कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.

अनेक मुस्लीम कब्रस्तानात लोक कबर खोदण्याचे तसेच कबरीची देखभाल दुरूस्तीचे काम करीत आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती फार हलाखीची झालेली आहे. त्याच लोकांना प्रथम प्राधान्य म्हणुन सुरक्षा रक्षकाचे काम दिल्यास त्यांचा उदरनिर्वाह होण्यास मदत होईल.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अब्दुल रहीम शेख नाईकवाडी **अनुमोदक:-**श्रीमती संगीता सुभाष वाघुले

मा.महापौर : विषय मंजूर, प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुस्लीम कब्रस्तानात सुरक्षा रक्षकाचे काम देतांना मुस्लीम कब्रस्तानात जे लोक कबर खोदण्याचे तसेच कबरीची देखभाल दुरूस्तीचे काम करीत आहेत त्याच लोकांना प्रथम प्राधान्य म्हणुन सुरक्षा रक्षकाचे काम नियमाप्रमाणे देण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कैलासनगर स्मशानभुमी ते MGM हॉस्पीटल लगतच्या मुख्य रस्त्यापर्यंतचा १८ मी.रुंद विकास योजना रस्ता विकसीत करण्याचे प्रस्तावित आहे. त्या करीता या रस्त्याचे अंदाजपत्रक रक्कम रुपये १४,९०,४३,६३६/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पामध्ये तरतुद करण्याची कार्यवाही करण्यात येईल. सदरील रस्ता विकासाच्या कामी या रस्त्यांच्या कैलासनगर स्मशानभुमी ते बसय्यैनगर ह्या भागातील बहुतांश भाग, सुरूवातीचा काही भाग सोडल्यास उर्वरित भागाच्या रस्त्याचे आखणीस समांतर नाला प्रवाह आहे व तो रस्त्याच्या जागेत आहे. रस्ता विकासामध्ये रस्तारुंदीचा विचार करता हा नाला रस्ता वापरासंबंधाने Cover करणे आवश्यक आहे. करीता ह्या भागाचे नाल्याकरीता Box Culvert चा समावेश ह्या अंदाजपत्रकामध्ये केलेला आहे. अशा प्रकारे:-

| | | |
|---|---|---|
| १. रस्ता विकासाचे अंदाजपत्रक | र.रु. | ११,८०,००,२१०.०० व |
| २. Box Culvert चे बांधकामासाठी | र.रु. | २,३९,४६,११०.०० |
| ३. असे एकत्रित रक्कम | र.रु. | १४,१९,४६,३२०.०० |

५% Contengencies + र.रु. ७०,९७,३१६.००

-----------------------------------------------------------

एकुण र.रु. १४,९०,४३,६३६.००

-----------------------------------------------------------

एवढ्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता झाली आहे. सदरील अंदाजपत्रक M/s Pavetech Consultant Pune, यांचेकडून करण्यात आले आहे.

सदर रस्त्याचे अंदाजपत्रक मान्यतेनंतर ह्या रस्त्याचे MGM लगतच्या रस्त्यापासून बसय्यैनगर पर्यंतच्या भागाचे काम प्रथम हाती घेण्यात येऊन सुरू करण्यात येईल व दरम्यानचे काळात बसय्यैनगर ते कैलासनगर स्मशानभुमी पर्यंतच्या रस्त्याचे भुसंपादनाची कार्यवाही करण्यात येईल. सदर रस्ता हा जालना रस्त्यास पर्याय म्हणुन एक महत्वपुर्ण लिंक असून रस्ता विकसीत झाल्यानंतर जालना रस्त्यावरील रहदारीचा भार कमी होईल.

करीता, कैलासनगर स्मशानभुमी ते MGM हॉस्पीटल लगतच्या मुख्य रस्त्यापर्यंतच्या १८ मी. रुंद विकास योजना रस्त्याच्या रस्ता विकास कामाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्री.सिताराम सुरे :हर्सुल परीसरात वार्ड क्र.२,७,८,४,५,१,३ मध्ये ७-८ डिपी रस्ते आहे. तीन रस्ते वर्दळीचे आहे. र.रु.१ लक्ष लोकसंख्या असेल नागरीकांना पावसाळ्यात त्रास होतो. रस्ते विकसीत होत नाही. टीडीआरच्या संचिका सादर केल्या. जळगाव ते पिसादेवी रोड हा ३६ मी. रस्ता तेथील नागरीकांनी मोबदला व टीडीआर साठी मागणी केली. कार्यवाही होत नाही. दुसरा रस्ता १२८ स.नं ते पिसादेवी रोड तिसरा रस्ता स.नं १८० ते १८६ पर्यंत हे रस्ते महत्वाचे आहे. केव्हा भुंसपादन होणार आहे. नसेल भुंसपादन करायचे नसेल तर रद्द करावे.

मा.महापौर :स.सदस्य यांनी केलेली सुचना विचारात घेऊन कार्यवाही करावी. विषय मंजूर प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कैलासनगर स्मशानभुमी ते MGM हॉस्पीटल लगतच्या मुख्य रस्त्यापर्यंतच्या १८ मी.रुंद विकास योजना रस्त्याच्या रस्ता विकास कामासाठी प्रस्तावातील मुद्दा १,२ व ३ मधील एकत्रित कामाच्या रक्कम रुपये १४,९०,४३,६३६.०० च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामासाठी नियमाप्रमाणे भुसंपादनाची कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शहर हागणदारीमुक्त करणे करीता ज्या नागरीकांकडे शौचालय नाही व ते उघड्यावर शौचास जात आहे अशा नागरीकांना अभियानाअंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधणेकरीता केंद्र शासन व राज्य शासनामार्फत अनुक्रमे रुपये ४०००+ रुपये ८००० असे एकूण रक्कम रुपये १२०००/- प्रति शौचालय इतके अनुदान वितरीत करण्यात येते. त्या माध्यमातून शहरामध्ये लाभार्थ्यांमार्फत वैयक्तिक शौचालय बांधण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

तथापि, पात्र लाभार्थ्यांचे प्रमाण अशा मोहल्ल्यांमध्ये जास्त आहे की जेथे जलनि:स्सारण वाहिन्या टाकलेल्या नाहीत त्यामुळे सदर भागात नागरीकांना सेप्टीक टँकसह शौचालय बांधणे आवश्यक आहे. त्यासाठी लाभार्थी यांना खुप जास्तीचा खर्च येत असल्यामुळे त्यांना अनुदानाचा पहिला हफ्ता रक्कम रुपये ६०००/- मिळून देखिल ते शौचालय बांधण्यास उदासिन आहे. त्याकरीता, शहरातील नामांकीत संस्था जसे CREDAI, बजाज फाऊंडेशन, CII, MASSIA आदी समवेत सदर अभियानात CSR च्या माध्यमातून सहभाग घेणे बाबत चर्चा केली असता त्यांनी सहभागी होण्यास अनुकूलता दर्शविलेली आहे.

CREDAI संस्थेने CSR च्या माध्यमातून Contractor, बांधकाम साहित्य उपलब्ध करून शौचालयाचे बांधकाम करण्यास तयारी दर्शविलेली आहे व त्यांनी राजनगर भागात सुमारे १५ ते २० शौचालयाचे बांधकाम सुरू केलेले आहे. तथापि, सेप्टीक टँकसह रक्कम रुपये १२०००/- मध्ये शौचालयाचे बांधकाम होत नाही. त्यासाठी किमान अतिरीक्त रक्कम रुपये ३०००/- ची आवश्यकता आहे. सदर अतिरीक्त रक्कम इतर संस्थेमार्फत CSR च्या माध्यमातून उपलब्ध करणेचे प्रयत्न सुरू आहे. परंतु सदर रक्कम उपलब्ध न झाल्यास महानगरपालिका फंडातून अतिरीक्त रक्कम रुपये ३०००/- प्रति शौचालय इतकी उपलब्ध करून द्यावी लागेल.

तसेच बजाज फाऊंडेशन त्याचे NGO मार्फत शौचालयाचे बांधकाम करण्यासाठी रक्कम रुपये १२०००/- व्यतिरीक्त आणखी लागणारी रक्कम रुपये ५०००/- व त्यापेक्षा कमी किंवा जास्त अतिरीक्त निधी देण्यासाठी तयार आहे. परंतु महानगरपालिकेने सुचविलेले इतर NGO यांना आर्थीक मदत देण्यास तयार नाही.

सदर अभियानांतर्गत लाभार्थ्यास RTGS करण्यात येत असलेले अनुदान रक्कम रुपये १२०००/- इतके संस्थेस महानगरपालिकेतर्फे वितरीत करणे त्यांना अपेक्षित आहे. परंतु शासन निर्देशनानुसार (शासन निर्णय क्रमांक/स्वभाअ/२०१५/प्रक्र.२३/नवि-३४ दिनांक १५ मे २०१५ व अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक स्वमअ-२०१६/सं.क्र.२२८/नवि-३४ दिनांक ०१ मार्च २०१६ नुसार) अनुदान लाभार्थीच्या बँक खात्यावर RTGS द्वारे जमा करणे व शौचालयाचे बांधकाम केवळ लाभार्थ्यांमार्फतच करून घेणे बंधनकारक आहे.

त्यानुषंगाने सदरील संस्था पात्र लाभार्थ्यांस बांधकाम सेप्टीक टँकसह पुर्ण करून देणार त्यासाठी मनपातर्फे लाभार्थ्यांकडून स्वयंघोषणापत्र घेणार ज्यामध्ये लाभार्थीस शौचालयासाठी मिळणारे अनुदान ते संस्थेस बिनशर्त हस्तांतरीत करणेस सहमती देणार आहे. त्या आधारे संस्थेस शौचालयाचे अनुदान लाभार्थ्यांमार्फत मिळणेकरीता महानगरपालिका सहकार्य करेल. अशा प्रकारे महानगरपलिका व संस्थेमध्ये Tripartiate Agreement करून संस्थेमार्फत शौचालयाचे बांधकाम करून घेण्यात येईल. त्यामुळे कामाची गती वाढेल व शासन निर्देशानुसार शहर ३१ मार्च २०१७ पर्यंत हागणदारीमुक्त होण्यास गती मिळेल.

शहरातील विविध सामाजिक संस्थामार्फत CSR च्या माध्यमातून शौचालय बांधकामासाठी शासन अनुदाना व्यतिरीक्त लागणारा अतिरीक्त खर्च किमान रक्कम रुपये ३०००/- इतका उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. परंतु निधी उपलब्ध न झाल्यास महानगरपालिकेस स्वतः निधी उभारावा लागेल. असे करावयाचे झाल्यास मनपाचे उद्दिष्ट ७००० शौचालयाचे आहे. त्यामधील जवळपास २६४३ शौचालय पुर्ण झालेले आहे. उर्वरित (७०००-२६४३) = ४३५७ शौचालयासाठी रक्कम रुपये ३०००/- प्रमाणे एकुण रक्कम रुपये १,३०,७१,०००/- (सुमारे १ कोटी ३१ लक्ष) इतका खर्च अपेक्षित आहे. त्यासाठी महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये तरतुद होणे आवश्यक आहे.

करीता, वरील प्रमाणे प्रस्तावित केल्यानुसार शहर दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत हागणदारीमुक्त करणेसाठी लाभार्थ्यांमार्फत अनुदान संस्थेस देणेकरीता लाभार्थ्यांचे स्वयंघोषणापत्र घेण्यात येऊन महानगरपालिका व संस्था यामध्ये Tripartiate Agreement करून वैयक्तिक शौचालयाचे शासनाचे अनुदान रक्कम रुपये १२०००/- व महानगरपालिकेचा हिस्सा र.रु.३०००/- असे एकुण रक्कम रुपये १५०००/- प्रती शौचालय इतके अनुदान संस्थेस शौचालयाचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांकडून वितरीत करणेच्या व रक्कम रुपये ३०००/- प्रती शौचालय महानगरपालिकेचा हिस्सा मंजुर करणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :हे काम करीत असतांना प्रशासनाने सीएसआरच्या माध्यमातून जास्तीत जास्त काम करावे. हा प्रस्ताव मंजूर, ऐनवेळचे सर्व विषय मंजूर, प्रश्न नंतर घेतले जातील.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत हागणदारीमुक्त करणेसाठी लाभार्थ्यांमार्फत अनुदान संस्थेस देणेकरीता लाभार्थ्यांचे स्वयंघोषणापत्र घेण्यात येऊन महानगरपालिका व संस्था यामध्ये Tripartiate Agreement करून वैयक्तिक शौचालयाचे शासनाचे अनुदान रक्कम रुपये १२०००/- व महानगरपालिकेचा हिस्सा र.रु.३०००/- असे एकुण रक्कम रुपये १५०००/- प्रती शौचालय इतके अनुदान संस्थेस शौचालयाचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांकडून वितरीत करणेच्या व रक्कम रुपये ३०००/- प्रती शौचालय महानगरपालिकेचा हिस्सा देण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या शहागंज परिसरात खेड्यापाड्यातील नागरीकांची ये-जा असते. तसेच या शहागंज येथे भाजीमंडी असून फार जुनी आहे. या ठिकाणी सार्वजनिक शौचालय नसल्याने शहागंज भाजीमंडई परिसरात येणाऱ्या नागरीकांना त्रास होत आहे.

तरी शहागंज परिसरात असलेल्या शहागंज भाजीमंडी येथे नागरीकांच्या सुविधेसाठी मनपातर्फे सार्वजनिक शौचालय उभारण्यात यावे, करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.रामेश्वर बाबुराव भादवे **अनुमोदक:-**श्री.भाऊसाहेब शिवाजी दांडगे

मा.महापौर : विषय मंजूर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहागंज परिसरात असलेल्या शहागंज भाजीमंडी येथे नागरीकांच्या सुविधेसाठी मनपातर्फे सार्वजनिक शौचालय उभारण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कैसर कॉलनी, वॉर्ड क्र.४५ ही मुस्लीम बहुल वसाहत असून येथे महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास योजनेतून सिमेंट रस्ता तयार करणेसाठी २० लाख रुपयाची तरतुद उपलब्धीसाठी प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्याकरीता सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती खतीजा छोटू कुरैशी **अनुमोदक:-** श्रीमती शबनम बेगम कलीम कुरैशी

मा.महापौर : विषय मंजूर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४५, कैसर कॉलनी येथे महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास योजनेतून सिमेंट रस्ता तयार करणेसाठी २० लाख रुपयाची तरतुद उपलब्धतेसाठी तसेच प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०४, बनेवाडी या भागामध्ये विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे अत्यंत गरजेचे असून त्यासाठी र.रु.२० लक्षचा निधी आवश्यक आहे.

करीता, वॉर्ड क्र.१०४, बनेवाडी या भागामध्ये विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकण्यासाठी मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामासाठीची तरतुद या लेखाशिर्षातून र.रु.२० लाखाचा निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्या करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.सिध्दांत संजय शिरसाट **अनुमोदक:-** श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर : विषय मंजूर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०४, बनेवाडी या भागामध्ये विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकण्यासाठी मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामासाठीची तरतुद या लेखाशिर्षातून र.रु.२० लाखाचा निधी उपलब्ध करून देण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नगर सचिव विभागातील कार्यरत दैनिक वेतन वर्ग-३ व वर्ग-४ चे कर्मचारी मागील बऱ्याच वर्षांपासून पदाधिकाऱ्यांच्या दालनात काम करीत आहे. त्यांना आयोजित केलेल्या मा.सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभा तसचे विशेष समित्यांच्या कामानिमित्त त्यांना सार्वजनिक सुट्टया, दुसरा व चौथा शनिवार या सुट्टयांच्या दिवशी कामे करावी लागतात. यामध्ये पदाधिकाऱ्यांचे कामानिमित्त किंवा त्यांच्या निर्देशानुसार संपर्क कार्यालयात किंवा त्यांच्या पक्षाच्या बैठकीस उपस्थित राहुन कार्यालयीन कामे करावी लागतात.

कायम स्वरुपी कर्मचाऱ्यांप्रमाणे त्यांना विशेष वाहन भत्ता किंवा त्यांना इतर लाभ देण्यात येत नाही. करीता, त्यांनी ज्या सार्वजनिक सुट्टया, दुसरा व चौथा शनिवार (रविवार वगळता) कामे केली असेल त्या दिवशीचे वेतन अदा करण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

**अनुमोदक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी, श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन, श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप

मा.महापौर :विषय मंजूर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नगर सचिव विभागातील कार्यरत दैनिक वेतन वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना कायम स्वरुपी कर्मचाऱ्यांप्रमाणे ज्या सार्वजनिक सुट्टया, दुसरा व चौथा शनिवार (रविवार वगळता) कामे केली असेल त्या दिवशीचे वेतन अदा करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात खालील काम करण्यासाठी आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे. तथापी, औरंगाबाद महानगरपालिकेचा स्मार्ट सिटी मध्ये समावेश झालेला असल्याने व शहर कचरामुक्त करण्याच्या दृष्टीकोनातून माझ्या प्रभागात विविध आकाराच्या डस्टबिन्स् भांडार विभागाअंतर्गत खरेदी करण्याचा लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नांव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात | १. शहर स्वच्छता अभियाना अंतर्गत परिसर स्वच्छ व |

| | | |
|---|---|---|
| | जीबीआर वॉर्ड-ई, पान क्र.०४ वर वॉर्ड क्र.८७ अंतर्गत रक्कम रुपये २५.०० लक्ष.<br><br>व्यापारी संकुले व इतर इमारती अ.क्र.-१ | कचरामुक्त करण्यासाठी वॉर्ड क्र.८७ अंतर्गत परिसरात विविध आकाराच्या व क्षमतेच्या कचराकुंड्या (डस्टबिन्स्) भांडार विभागा अंतर्गत खरेदी करण्यासाठी रक्कम रुपये २०.०० लक्ष आणि परिसरातील ग्रीन बेल्ट विकसीत करण्यासाठी रक्कम रुपये ०५.०० लक्ष खर्च करणे. |

**सुचक:-**श्री.मनोज बन्सीलाल गांगवे **अनुमोदक:-**श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड
मा.महापौर : विषय मंजूर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पातील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजूरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नांव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात जीबीआर वॉर्ड-ई, पान क्र.०४ वर वॉर्ड क्र.८७ अंतर्गत रक्कम रुपये २५.०० लक्ष.<br>व्यापारी संकुले व इतर इमारती अ.क्र.-१ | १. शहर स्वच्छता अभियाना अंतर्गत परिसर स्वच्छ व कचरामुक्त करण्यासाठी वॉर्ड क्र.८७ अंतर्गत परिसरात विविध आकाराच्या व क्षमतेच्या कचराकुंड्या (डस्टबिन्स्) भांडार विभागा अंतर्गत खरेदी करण्यासाठी रक्कम रुपये २०.०० लक्ष आणि परिसरातील ग्रीन बेल्ट विकसीत करण्यासाठी रक्कम रुपये ०५.०० लक्ष खर्च करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५४ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११५, गट नंबर ४१, सातारा परिसर, कमलनयन बजाज हॉस्पीटल समोर विकसीत ५० ग्रीन्स/१०८ ग्रीन्स भागास पाणी पुरवठा करण्याची मागणी आहे. या भागास पाणी पुरवठा करावयाचा झाल्यास पैठणरोड उड्डाणपुल येथून जलवाहिनी टाकावी लागणार आहे. या कामासाठी येणारा संपूर्ण खर्च ५०ग्रीन्स/१०८ ग्रीन्स मधील मिळकतधारक देय मालमत्ता करापोटी आगाऊ रक्कम म्हणून औरंगाबाद महानगरपालिकेस देणार आहे. जमा होणारी सदरील रक्कम मिळकतधारकाच्या मालमत्ता कर म्हणून जमा घ्यावी व त्याचे समायोजन मालमत्ताकरातुन करावे.

या कामांतर्गत १५०,२००,२५० व ३०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी टाकावी लागणार असून, ५०ग्रीन्स/१०८ग्रीन्स मधील मिळकतधारकांकडून कामासाठी लागणारी रक्कम महानगरपालिकेस प्राप्त झाल्यावर काम हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.

तरी, उक्त प्रमाणे कमलनयन बजाज हॉस्पीटल समोर विकसीत ५०ग्रीन्स/१०८ग्रीन्स भागास पाणी पुरवठा करण्यासाठी १५०,२००,२५० व ३०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे काम संबंधीत मिळकतधारक यांचेकडून कामास खर्च येणारी रक्कम प्रथम वसुल करून नंतर काम करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सिध्दांत संजय शिरसाट **अनुमोदक:-** श्रीमती विमल गोविंद केंद्रे
मा.महापौर : विषय मंजूर,प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११५, गट नंबर ४१, सातारा परिसर, कमलनयन बजाज हॉस्पीटल समोर विकसीत ५० ग्रीन्स/१०८ ग्रीन्स भागास पाणी पुरवठा करण्यासाठी नियमाप्रमाणे संबंधीत मिळकतधारक यांच्याकडून देय असलेल्या मालमत्ता करापोटी आगाऊ रक्कम म्हणून महानगरपालिका फंडात जमा करून घेऊन त्याचे समायोजन मालमत्ता करातून करण्यास तसेच संबंधीत मिळकतधारक यांचेकडून जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम संबंधीत मिळकतधारकांकडून प्रथम वसुल करून नंतर काम करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक १८.०१.१९९९ नुसार ज्या कर्मचाऱ्यांचे पती किंवा पत्नी महानगरपालिका सेवेत आहेत. त्यांना महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेता येईल. पती/पत्नी एकत्रीकरणाच्या संदर्भात श्री.झुंजूरडे धनराज सिताराम हे महानगरपालिकेच्या संजयनगर केंद्र मुकूंदवाडी या ठिकाणी सहशिक्षक पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या पत्नी श्रीमती भिंगोले अनुजा संग्राम या जि.प.प्राथमिक शाळा, देमणी केंद्र, शेकटा, ता.जि.औरंगाबाद या ठिकाणी कार्यरत असून त्यांची सेवा महानगरपालिका औरंगाबादकडे वर्ग करणेबाबत जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.

करीता, श्रीमती भिंगोले अनुजा संग्राम, सहशिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देमणी केंद्र, शेकटा, ता.जि.औरंगाबाद यांना महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेणेबाबत नियमानुसार कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**सुचक:-**श्री.कचरु छगनराव घोडके

**अनुमोदक:-**श्रीमती शोभा गुरूलिंगप्पा बुरांडे, श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ

मा.महापौर : विषय मंजूर, प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती भिंगोले अनुजा संग्राम, सहशिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देमणी केंद्र, शेकटा, ता.जि.औरंगाबाद यांची सेवा महानगरपालिका औरंगाबादकडे वर्ग करण्याबाबत जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यामुळे पती/पत्नी एकत्रीकरणाच्या संदर्भात नियमानुसार श्रीमती भिंगोले अनुजा संग्राम, सहशिक्षक,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देमणी केंद्र, शेकटा, ता.जि.औरंगाबाद यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.चंद्रसागर महाराज यांच्या प्रेरणेने सन १९५० मध्ये श्री.चंद्रसागर दिगंबर जैन धर्मशाळा स्थापन करण्यात आलेली आहे. ही धर्मशाळा आजही वापरात आहे. श्री.चंद्रसागर महाराज यांच्या प्रेरणेने शहरात अनेक समाजपयोगी कामे करण्यात आलेली आहेत.

श्री.चंद्रसागर महाराज यांच्या कार्याची प्रेरणा नवीन पिढीस रहावी या हेतूने सरदार पटेल मार्ग (चेलीपूरा) ते संस्थान गणपती मार्गावरील चौकास "तपोनिधी आचार्यकल्प श्री १०८ चंद्रसागर महाराज मार्ग" असे नाव देण्यात यावे.

करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** कु.यशश्री लक्ष्मीनारायण बाखरीया **अनुमोदक:-** श्री.अजिम अहेमद रफिक

मा.महापौर : विषय मंजूर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सरदार पटेल मार्ग (चेलीपूरा) ते संस्थान गणपती मार्गावरील चौकास "तपोनिधी आचार्यकल्प श्री १०८ चंद्रसागर महाराज मार्ग" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११४, देवळाई, शिवाजीनगर रेल्वेपटरी पासून देवळाई गावाकडे जाणाऱ्या बीड बायपास रोडवरील चौकास "देवळाई चौक" हे नाव देण्यात यावे.

करीता, शिवाजी नगर रेल्वेपटरी पासून देवळाई गावाकडे जाणाऱ्या बीड बायपास रोडवरील चौकास "देवळाई चौक" हे नाव देण्यात यावे. करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे **अनुमोदक:-** श्रीमती विमल जनार्धन कांबळे

मा.महापौर : विषय मंजूर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिवाजी नगर रेल्वेपटरी पासून देवळाई गावाकडे जाणाऱ्या बीड बायपास रोडवरील चौकास "देवळाई चौक" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११४, सातारा-देवळाई अंतर्गत भारतमाता कॉलनी येथील २५ फुट रोडवरील चौकास "शिवछत्रपती चौक" असे नाव देण्यात यावे.

करीता, भारतमाता कॉलनी मधील २५ फुट रोडवरील चौकास "शिवछत्रपती चौक" असे नाव देण्यात यावे. करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे **अनुमोदक:-** श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड

मा.महापौर : विषय मंजूर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११४, सातारा-देवळाई अंतर्गत असलेल्या भारतमाता कॉलनी येथील २५ फुट रोडवरील चौकास "शिवछत्रपती चौक" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील समाविष्ट कामांचे लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र | अंदाजपत्रकातील अ.क्र मुळ काम | रक्कम लाखात | सुधारित काम | रक्कम लाखात |
|---|---|---|---|---|
| ०१ | वार्ड क्र.१०७ ईटखेडा अंतर्गत शिवसमाधान कॉलनी नाथनगर भागात डांबरीकरण करणे. GBR/WA-8/PageNo.45 | २०.०० | १.वार्ड क्र.१०७, ईटखेडा अंतर्गत सेंट जॉन शाळा ते श्रीरंग सिटी प्राईड गॅलक्सी कडे जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण व कॉंक्रेटीकरण करणे.<br>२.बीड बाय पास ते सहारा कॉलनी/ मदरसा शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणे. | २५.००<br>१०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | वार्ड क्र.१०७ ईटखेडा अंतर्गत पैठण रोड ते बेस्ट मॉलच्या बाजुला ऑरेंज सिटीकडे जाणाऱ्या डांबरीकरण करणे. GBR/WA-8/PageNo.04 | २०.०० | १.वार्ड क्र.१०७ ईटखेडा अंतर्गत बीडबाय पास रोड हमीदिया पार्क / सहारा सिटी कॉंक्रेटीकरण करणे.<br>२.वार्ड क्र.१०७ ईटखेडा अंतर्गत बीड बाय पास रोड हमीदिया गार्डन या परिसरामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे. | १०.००<br>१०.०० |
| ०३ | वार्ड क्र १०७, ईटखेडा अंतर्गत साई वृदांवन कॉलनी पैठण रोड भाग-२ मध्ये डांबरीकरण करणे. GBR/WA-8/PageNo.04 | १५.०० | | ५५.०० |
| | | ५५.०० | | |

**सुचक:-**श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर : विषय मंजूर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील समाविष्ट कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजूरी देण्यात येते.

| अ.क्र | अंदाजपत्रकातील अ.क्र मुळ काम | रक्कम लाखात | सुधारित काम | रक्कम लाखात |
|---|---|---|---|---|
| ०१ | वार्ड क्र.१०७ ईटखेडा अंतर्गत शिवसमाधान कॉलनी नाथनगर भागात डांबरीकरण करणे. GBR/WA-8/PageNo.45 | २०.०० | १.वार्ड क्र.१०७, ईटखेडा अंतर्गत सेंट जॉन शाळा ते श्रीरंग सिटी प्राईड गॅलक्सी कडे जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण व कॉंक्रेटीकरण करणे.<br>२.बीड बाय पास ते सहारा कॉलनी/ मदरसा शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणे. | २५.००<br>१०.०० |
| ०२ | वार्ड क्र.१०७ ईटखेडा अंतर्गत पैठण रोड ते बेस्ट मॉलच्या बाजुला ऑरेंज सिटीकडे जाणाऱ्या डांबरीकरण करणे. GBR/WA-8/PageNo.04 | २०.०० | १. वार्ड क्र.१०७ ईटखेडा अंतर्गत बीडबाय पास रोड हमीदिया पार्क/ सहारा सिटी कॉंक्रेटीकरण करणे.<br>२. वार्ड क्र.१०७ ईटखेडा अंतर्गत बीड बाय पास रोड हमीदिया गार्डन या परिसरामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे. | १०.००<br>१०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | वार्ड क्र १०७, ईटखेडा अंतर्गत साई वृदांवन कॉलनी पैठण रोड भाग-२ मध्ये डांबरीकरण करणे.<br>GBR/WA-8/PageNo.04 | १५.०० | | ५५.०० |
| | | ५५.०० | | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९६०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, राज्यातील अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांनी शासन निर्णय जारी केला असून यामध्ये महानगरपालिका/नगर परिषद क्षेत्रातील ज्या प्रभागातील एकुण लोकसंख्येच्या किमान १०% लोकसंख्या अल्पसंख्यांक (मुस्लीम,ख्रिश्चन,बौध्द,जैन,शिख व पारसी) समाजाची आहे. अशा प्रभागाची निवड करण्याबाबत निर्देशीत केले आहे. या शासन निर्णयानुसार महानगरपालिकेसाठी मा.विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. या समितीमध्ये जिल्हाधिकारी, (सदस्य) व आयुक्त महानगरपालिका हे (सदस्य सचिव) आहेत. या शासन निर्णयानुसार गठीत करण्यात आलेल्या समिती समोर औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विविध विकास कामांना मान्यता देण्यासाठीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर समितीची अंतिम बैठक दिनांक २३.११.२०१६ रोजी मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेली असून या बैठकीत एकुण १३ विकास कामांना समितीने मान्यता प्रदान केली आहे. त्यामध्ये दिल्लीगेट, हिमायतबाग येथे औकाफ (वक्फ बोर्ड औरंगाबाद) च्या मालकीच्या जागेवर सांस्कृतीक सभागृह बांधणे या कामास प्रशासकीय मंजुरी प्रदान केली आहे.

ज्या जागेवर सदर सांस्कृतीक सभागृह बांधावयाचे असून ती जागा औरंगाबाद वक्फ बोर्डाच्या मालकीची जागा आहे. त्यास महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांनी जा.क्र./ मरावंम/एस.एन.टी./५२९/३७३२/२०१६ दिनांक २७ सप्टेंबर २०१६ च्या पत्रानुसार ना-हरकत प्रमाणपत्र दिले असून त्यात नमुद अटीनुसार या कामामुळे मालकी हक्कात किंवा इतर कोणत्याही अधिकारात बदल होणार नाही. वक्फ बोर्डाकडून आर्थिक सहाय्य दिले जाणार नाही. तसेच या इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर, त्याचे संचलन करणेसाठी सदर इमारत वक्फ बोर्डाच्या ताब्यात देण्यात यावी, या इमारतीची देखभाल वक्फ मंडळ करील या अटीवर ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे. या पत्रानुसार सुमारे ३८०० चौ.मी.जागा सदरचे सांस्कृतिक सभागृह बांधणेसाठी उपलब्ध होणार आहे. तसेच प्रकरणी राज्याचे अल्पसंख्यांक विकास विभागाने क्रमांक :वक्फ २०१५/प.क्र/२७७/क्र-४/दिनांक १६ मे २०१६ नूसार या प्राप्त होणाऱ्या एकुण अनूदानामधील रक्कम रु.२.०० कोटी मधून वक्फ बोर्डाच्या जागेवर सांस्कृतिक सभागृह बांधणेसाठी सदरील शादीखान्याचे बांधकाम पुर्ण झाल्यावर इमारत त्यांच्या संचलना करीता वक्फ बोर्डाकडे सोपविली जाईल. या अटीवर तत्वत: मान्यता प्रदान केली आहे,

त्यानूसार सदरचे शादीखाना/सांस्कृतीक सभागृह बांधणेसाठी आवश्यक क्षेत्रफळाची जागा ताब्यात देणे बाबत वक्फ बोर्डाकडे पत्रव्यवहार करण्यात येत आहे, सदरची जागा ताब्यात आल्यानंतर पुढील निविदेची कार्यवाही करण्यात येईल. सदर कामाच्या अंदाजपत्रकास दिनांक ३०.०१.२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच या कामासाठी वास्तू विशारद यांची नेमणूक करण्यासाठी प्रस्ताव मागविले असता एकुण प्रकल्प किंमतीच्या १.५% दराने काम प्रदान करण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

तरी सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ९९,९९,९२९/- चा प्रस्ताव व सदरील कामासाठी वास्तुविशारद/इंजिनियर यांचा वाटाघाटीनंतर नेमणुकीचा ०.८५% अधिक सर्व्हिस टॅक्स या दराचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिल्लीगेट, हिमायतबाग येथे औकाफ (वक्फ बोर्ड औरंगाबाद) च्या मालकीच्या जागेवर नियमाप्रमाणे सांस्कृतीक सभागृह बांधणेच्या कामाच्या रक्कम रुपये ९९,९९,९२९/- च्या अंदाजपत्रकास प्रस्तावात नमुद अटी/शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येते तसेच सदरील कामासाठी वास्तुविशारद/ इंजिनियर यांचा वाटाघाटीनंतरच्या नेमणुकीचा ०.८५% अधिक सर्व्हिस टॅक्सच्या दरास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासनाकडून प्राप्त रस्ते बांधणे व दुरूस्ती अनुदान या योजनेअंतर्गत शासनाकडून प्राप्त निधीमधून वॉर्ड क्र.४६ नवाबपुरा अंतर्गत रणमस्तपुरा, गवळीपुरा भागातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी रक्कम रुपये ५० लक्षचा निधी उपलब्ध करून देण्यात यावा. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.खान फेरोज मोईनोद्दीन **अनुमोदक:-** श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४६ नवाबपुरा अंतर्गत रणमस्तपुरा, गवळीपुरा भागातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी शासनाकडून प्राप्त रस्ते बांधणे व दुरूस्ती अनुदान या योजनेअंतर्गत रक्कम रुपये ५० लक्षचा निधी उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६२:-** **(शुक्रवार दिनांक २९.०४.२०१६ का.प.क्र.१८ विशेष सर्वसाधारण सभेतील स्थगीत विषय क्रमांक ४१२)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि.२९/४/२०१६ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत विषय क्र.४१२ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध मंजूरीस्तव सादर करण्यात आला होता. तथापि,आकृतीबंधामध्ये नमूद केलेली पदसंख्या नियमानुसार बरोबर आहे किंवा कसे, याबाबत सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर करण्यास मा.सर्वसाधारण सभेने मंजूरी देऊन प्रस्तावास स्थगिती दिली होती.

यापूर्वी सादर केलेल्या आकृतीबंधामध्ये नमूद केलेली पदसंख्या ही महानगरपालिका आस्थापनेवरील एकूण ४७९९ मंजूर पदांव्यतिरिक्त नवनिर्मित १७६५ पदांचा समावेश करण्यात आलेला होता.

त्यानुषंगाने आकृतीबंधामध्ये नमूद केलेल्या पदसंख्येबाबत पुन्हा चौकशी करुन आढावा घेतला असता,महानगरपालिकेने सद्यस्थितीत १४ माध्यमिक शाळा सुरु केल्याने माध्यमिक शिक्षकांची आवश्यकता राहणार आहे. त्यामुळे पूर्वीच्या प्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांची पदे कमी करुन माध्यमिक शिक्षकांची पदे,शारिरीक शिक्षकांची पदे तसेच सद्यस्थितीत वर्ग-३ व ४ संवर्गात कार्यरत दैनिक/ठराविक वेतनावरील व सातारा/देवळाई कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या पदांचा समावेश करण्यात आलेला असून वाढीव पदांची संख्या ही १७९५ एवढी होत आहे.

औरंगाबाद शहराची लोकसंख्या १५ लक्षच्या आसपास आहे. लोकसंख्येचे प्रमाण वाढलेले असून शहराचा विस्तार देखील वाढलेला आहे. सध्या ०९ वॉर्ड कार्यालये असून सातारा व देवळाई भाग

महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झाल्याने प्रभागांची संख्या ११५ झाली आहे. भविष्यात आणखी वॉर्ड कार्यालये वाढणार आहेत. तसेच शहरातील वाढत्या मालमत्ता लक्षात घेता कर वसूलीसाठी व कार्यालयीन कामासाठी, नागरिकांना पुरवावयाच्या सोयी सुविधांची देखभाल दुरुस्ती आणि नविन विकास कामे करण्यासाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

- औरंगाबाद शहर हे पर्यटन स्थळ असून येथे देश-विदेशातून पर्यटक येत असतात. पर्यटकांना अधिकाधिक सुविधा व पर्यटन क्षेत्रांची अद्यावत माहिती उपलब्ध करुन देणे, मनपा हद्दीतील पर्यटन क्षेत्रांचा विकास करणे इ. साठी अधिकारी/कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.
- महानगरपालिकेच्या सुमारे ७० शाळा असून सर्व शाळांवर नियंत्रण ठेवणे, विविध क्रिडा स्पर्धाचे आयोजन करणे इ. साठी अधिकारी/कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे**.**
- समांतर पाणीपुरवठा योजना महानगरपालिकेकडे स्थलांतरीत झाल्याने मोठ्या प्रमाणात तांत्रिक अधिकारी/कर्मचाऱ्यांची आवश्यकता भासणार आहे.
- औरंगाबाद शहराचा स्मार्ट सिटी मध्ये समावेश झाला असल्याने नागरिकांना ऑनलाईन सुविधा पुरविणे तसेच वॉर्ड कार्यालयातंर्गत मालमत्ता कराची देयके तयार करुन देणे, ऑनलाईन विविध करांचा भरणा करुन घेणे, सर्व विभागांची माहिती ऑनलाईन उपलब्ध करुन देणे, सर्व विभागांतील संगणक संचाची देखभाल करणे, मनपाच्या वेबसाईट संदर्भातील कामे करणे इ. साठी कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.
- मनपाच्या मालकीच्या इमारती जसे शाळा, दवाखाने, नाट्यगृहे, पाण्याच्या टाक्या, सभागृहे,तलाव,वॉर्ड कार्यालये, मुख्यालय,क्रिडा संकुल, स्मशानभूमी/कब्रस्तान इ. च्या सुरक्षेसाठी सुरक्षा अधिकारी/कर्मचाऱ्यांची आवश्यक आहे.
- शहरातील व शहरालगत असलेल्या एम.आय.डी.सी. मुळे वाढते प्रदुषण रोखण्यासाठी तसेच शहरातील पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षतोडीला आळा घालणे, वृक्षांचे जतन, संवर्धन करणे इ. साठी अधिकारी/कर्मचाऱ्यांची आवश्यक आहे.
- प्राणिसंग्रहालयाच्या नवीन योजना व विकास करणे, पडेगांव कत्तलखाना आधुनिकीरण करणे,आधुनिक पध्दतीचे मच्छी/मटन मार्केट कार्यान्वित करणे, शहरातील अवैध जनावरांचे गोठे शहराबाहेर स्थलांतरीत करणे,दुग्धनगरी विकसित करणे,वराह पालनासाठी शहराबाहेर जागा उपलब्ध करुन देणे, अनधिकृत मांस विक्रीवर प्रतिबंध घालणे इ. कामांसाठी कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.
- अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवेमध्ये येते. कालांतराने कर्मचारी सेवानिवृत्त होत असल्याने सद्यस्थितीत कर्मचारी संख्या अपुरी आहे. शहराचे क्षेत्रफळ अंदाजे १७५ चौरस कि.मी. पर्यंत झाले आहे. सध्या ०३ अग्निशमन केंद्र असून आणखी ०५ अग्निशमन केंद्र सुरु होणार आहेत. त्यादृष्टीने नागरिकांना अग्निशमन सेवा पुरविणे आवश्यक असल्याने अधिकारी/कर्मचाऱ्यांची अत्यंत आवश्यकता आहे.
- शहराच्या वाढलेल्या विस्तारा नुसार नागरिकांना पुरवावयाच्या सोयी सुविधांची देखभाल दुरुस्ती आणि नव्याने बांधणीची कामे करावी लागणार आहेत. तसेच सध्या मंजूर असलेली पदसंख्या ही अत्यंत अपुरी असल्याने महानगरपालिकेच्या नियोजन व विकास कामांवर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे कामांची देखभाल दुरुस्ती, दक्षता व गुणवत्ता राखणेसाठी,शहराच्या वाढलेल्या व्याप्ती व लोकसंख्येमुळे होत असलेल्या नवीन बांधकामांना परवानगी देणे,गुंठेवारी वसाहती नियमित करणे,बांधकाम संदर्भाने विविध परवानग्या देणे शहरातील बेकायदेशीर बांधकामे निष्कासित करणे, रस्त्यावरील अतिक्रमणे हटविणे इ.साठी अधिकारी/कर्मचाऱ्यांची अत्यंत आवश्यकता आहे.

- महानगरपालिकेच्या जलतरण तलावात महिलांसाठी स्वतंत्र प्रशिक्षक नाही. प्रशिक्षण घेण्यासाठी व पोहण्यासाठी येणाऱ्या स्त्री, पुरुष व मुलांची संख्या वाढत आहे. भविष्यात जलतरण तलावांची संख्या वाढणार असून तलावाची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

- सद्यस्थितीत शहरात एकूण ०५ हॉस्पिटल व २५ आरोग्य केंद्रे आहेत. तथापि, सातारा व देवळाई भागाचा समावेश झाल्याने आणखी ०८ आरोग्य केंद्रे सुरु करावयाची आहेत. तसेच ३०० खाटांचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल बांधण्याचे प्रस्तावित आहे. याठिकाणी मोठ्या प्रमाणात वैद्यकीय सेवा पुरवाव्या लागतील. त्यामुळे आरोग्य सेवेतील विविध पदांची अत्यंत आवश्यकता आहे.

उक्त बाबींचा विचार करता, नवनिर्मित १७९५ वाढीव पदांची आवश्यकता आहे. सदर वाढीव पदे भरल्यास सरासरी प्रतिमाह रु.२ कोटी ६४ लक्ष व वार्षिक रु.३१ कोटी ७४ लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. महानगरपालिकेचा आस्थापना खर्च ३०.४२% इतका असून नवनिर्मित वाढीव पदांना मंजूरी देऊन सदरची पदे भरल्यास आस्थापना खर्चात ७.१०% वाढ होईल.

करीता अधिकारी/कर्मचाऱ्यांचा आकृतीबंधाचा सुधारित प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय दुरूस्तीसह मंजुर. तसेच सेवा भरती नियमास दुरूस्तीसह मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध नवनिर्मित वाढीव पदांना, तसेच वाढीव पदे भरण्याच्या आकृतीबंधाच्या प्रस्तावास तसेच सेवा भरती नियमात खालील प्रमाणे दुरूस्ती करण्यास मंजूरी देण्यात येते.

**(अ) <u>आकृतीबंदामध्ये करावयाच्या दुरूस्त्या</u>**

१. परिशिष्ट-ब मधील पान क्रमांक ३४ मधील लेखा विभाग अ.क.४ वरील नमुद मंजूर पदांची संख्या निरंक दर्शविण्यात आली असून लेखापालाची दोन (०२) पदे मंजूर आहेत.

2. उपआयुक्त कार्यालय, उपआयुक्त 03 पदे, वार्ड अभियंता विभाग 09 पदे, वार्ड अधिकारी विभाग 09 पदे, करमुल्य निर्धारक व संकलक विभाग 01 पद, अभिलेख विभाग 01 पद, जनगणना विभाग 01 पद, नगर सचिव विभाग 01 पद, पर्यावरण विभाग 01 पद, नगररचना विभाग 01 पद, संशोधन केंद्र 04 पदे एकुण 31 पदे कार्यालयीन अधिक्षक संवर्गात समाविष्ठ करण्यात यावे. यामुळे एकुण 60 पदे निर्माण होतील. तसेच सहाय्यक अधिक्षक हे पद आकृतीबंधातुन वगळण्यास मंजूरी देण्यात येते तसेच सहाय्यक अधिक्षक या पदनामाऐवजी कार्यालयीन अधिक्षक या वाढीव पदनामास मंजूरी देण्यात येते. यामुळे अस्थापना खर्च कमी होईल.

3. परिशिष्ट-ब मधील पान क्रमांक २० वरील समाजकल्याण विभागामध्ये कार्यालयीन कामकाजासाठी 02 लिपीक पदाचा समावेश करण्यास मंजूरी देण्यात येते.

4. परिशिष्ट-ब मधील पान क्रमांक ३५ वरील नगर सचिव विभागाअंतर्गत अ.क्र.०५ वर दर्शविलेल्या लघुलेखक (निम्नश्रेणी) गट-क एक संख्या दर्शविली असुन वाढीव एक (०१) लघुलेखक (निम्नश्रेणी) गट-क पदाचा समावेश करण्यास मंजूरी देण्यात येते.

**(ब) <u>सेवा भरती नियमामध्ये करावयाच्या दुरूस्त्या</u>**

1. कनिष्ठ अभियंता Networking या पदासाठी - B.E. Electronic & Tele Communication पदवी उत्तीर्ण तसेच (C.C.N.A.) सिसको सर्टीफाईड नेटवर्क असोसिएटस कोर्स आवश्यक तसेच या पदावर काम केल्याचा 03 वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

२. महिला व बालविकास विभाग - महिला व बालविकास विभाग - सेवा भरती नियमामध्ये शैक्षणिक अर्हता M.S.W. व L.G.S. परिक्षा उत्तीर्ण आवश्यक.
3. वृक्ष संवर्धन व उद्यान अधिक्षक तसेच उपवृक्ष संवर्धन व सहाय्यक उद्यान अधिक्षक या पदाकरीता सेवा भरती नियमामध्ये दर्शविलेल्या बी.एस्सी हार्टीकल्चर ही अर्हता **किंवा** मान्यताप्राप्त विद्यापिठाच्या बीएस्सी विज्ञानशाखेची पदवी आवश्यक.
4. अधिक्षक पदासाठी वरिष्ठ लिपीक पदाचा 03 वर्षाचा अनुभव आवश्यक.
5. वरिष्ठ लिपीक पदासाठी नामनिर्देशनामध्ये L.S.G.D. उत्तीर्ण आवश्यक
6. लघुटंकलेखक - उपरोक्त अर्हता धारण करणाऱ्या कनिष्ठ लिपीक/टंकलेखक संवर्गातुन पदोन्नतीने नियुक्ती (50 टक्के पदोन्नती, 50 टक्के नामनिर्देशन) आवश्यक
7. लेखा लिपीक/कनिष्ठ लेखापरिक्षक हे पद 50 टक्के पदोन्नतीने तसेच 50 टक्के नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती आवश्यक.
८. सहाय्यक संचालक नगर रचनाकार **-** या पदाचे कनिष्ठ संवर्ग नगर रचनाकार असून केवळ नगर रचनाकार पदावर नियुक्त अधिका-यास या पदावर पदोन्नती आवश्यक. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६२/१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन निर्णय क्रमांक स.रस्ता/२०१७/प्र.क्र.४०/नवि-१६ दिनांक २८.०२.२०१७ अन्वये प्राप्त अनुदान रक्कम रुपये ५०.०० लक्ष चा निधी वॉर्ड क्र.११३ अंतर्गत आनंदनगर येथील रस्त्यांचे कामे करण्यासाठी देण्यात यावा.

सदरील काम करणे अत्यंत आवश्यक असून सदरील निधी अंतर्गत प्रस्तावित काम करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड **अनुमोदक:-**श्री.रमेश भानुदास जायभाय

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णय क्रमांक स.रस्ता/२०१७/प्र.क्र.४०/नवि-१६ दिनांक २८.०२.२०१७ अन्वये प्राप्त अनुदान रक्कम रुपये ५०.०० लक्षचा निधी वॉर्ड क्र.११३ अंतर्गत असलेल्या आनंदनगर येथील रस्त्यांचे कामे करण्यासाठी देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याबरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.महापौर यांची घोषित केले.

(दिलीप डी. सुर्यवंशी)
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद